# स्कूल बस धोरण-२०११
# शालेय विद्यार्थी वाहतूक नियमावली

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समितीची रचना | २ |
| २ | शालेय विद्यार्थी वाहतुकीबाबत अधिसुचना दि. २२/०३/२०११ | ३ ते १५ |
| ३ | शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बसबाबत कररचना | १६ ते १८ |
| ४ | शालेय शिक्षण विभाग व क्रीडा विभाग अधिसुचना दि. १४/०९/२०११ | १९ ते ३५ |
| ५ | वेगमर्यादा नियंत्रक (स्पीड गव्हर्नर) | ३६ ते ४३ |
| ६ | स्कूल बस तपासणी अहवाल / सुची | ४४ ते ४७ |
| ७ | शालेय बसची वयोमर्यादा | ४८ |
| ८ | वाहतूक संघटनेच्या प्रतिनिधींची नेमणुक | ४९ |
| ९ | मोठ्या सुट्ट्रीच्या कालावधीत शालेय बसला विशेष परवाना देणेबाबत | ५० ते ५१ |
| १० | शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बसेसबाबत मार्गदर्शक सुचना | ५२ ते ५६ |
| ११ | स्कूल बस नियमावली अंतर्गत परवाना देणे व कर आकारणी करणे | ५७ |


RTO PUNE COPY RIGHT

# जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समितीची रचना

| महानगरपालिका क्षेत्र | |
|---|---|
| अध्यक्ष | पोलीस आयुक्त |
| सदस्य | महानगरपालिका आयुक्त / अतिरिक्त आयुक्त/उप आयुक्त |
| | महानगरपालिका परिवहन महाव्यवस्थापक / परिवहन व्यवस्थापक |
| | शिक्षण निरीक्षक, मुंबई (मध्य/पूर्व/पश्चिम) / शिक्षणाधिकारी |
| | स्कूल बस वाहतुकदार संघटनेचे प्रतिनिधी |
| | श्रीमती इंद्रानी मलकानी, आमंत्रित सदस्य (मुंबईकरिता) |
| | अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेले शाळा व महाविद्यालय यांचे प्रतिनिधी |
| सदस्य सचिव | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी |

| जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समिती | |
|---|---|
| अध्यक्ष | पोलीस अधिक्षक, ग्रामीण |
| सदस्य | मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ |
| | मुख्य अधिकारी, नगर परिषद |
| | शिक्षण अधिकारी (प्राथमिक व माध्यमिक शिक्षण) |
| | अध्यक्षांनी नियुक्त केलेले प्रतिनिधी |
| सदस्य सचिव | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी |

| शालेय परिवहन समिती | |
|---|---|
| अध्यक्ष | मुख्याध्यापक / प्राचार्य |
| सदस्य | पालक-शिक्षक संघाचा प्रतिनिधी |
| | वाहतूक पोलीस निरीक्षक / पोलीस निरीक्षक |
| | मोटार वाहन निरीक्षक / सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक |
| | शिक्षण निरीक्षक |
| | बस कंत्राटदाराचा प्रतिनिधी |
| | स्थानिक प्राधिकरणाचा प्रतिनिधी |

RTO PUNE COPY RIGHT

**महाराष्ट्र शासन राजपत्र**
**असाधारण भाग चार – अ**
**(वर्ष ३, अंक ३) मंगळवार, मार्च २२, २०११ / चैत्र, १४, शके १९३२ (पृष्ठे २९)**
**किंमत : रूपये १२.००**

**असाधारण क्रमांक १८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक – अ आणि एक – ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

**मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक २२ मार्च २०११**

**अधिसूचना**

मोटार वाहन अधिनियम, १९८८

क्रमांक एमव्हीआर ०८०८/प्र.क्र. १५३/परि–२, मोटार वाहन अधिनियम, १९८८, (१९८८ चा ५९) याच्या कलम ९६, पोटकलम (२), खंड (तेहतीस) आणि कलम १११, कलम ११७ तसेच कलम ६७ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या बाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा आणि त्या बाबतीत शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन उक्त अधिनियमाच्या कलम २१२ च्या पोटकलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, पूर्वीच प्रसिद्ध करण्यात आलेले पुढील नियम करीत आहे.

**भाग चार अ १८–१**

१. या नियमांना महाराष्ट्र व मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम २०११, असे म्हणावे.

*या नियमांना, महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम), (पहिली सुधारणा) नियम, २०१२ असे म्हणावे.

२. *महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम, २०११ (यात यापुढे ज्यांचा निर्देश ''मुख्य नियम'' असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम २ मध्ये (क) खंड (ड) मध्ये ''चारचाकी हलक्या मोटार वाहनांचा'' या मजकूरानंतर पुढील मजकूर जादा दाखल करण्यात येईल –

''आणि परिवहन आयुक्तांकडून वेळोवेळी मान्यता देण्यात येतील अशी आसन व्यवस्था व सुरक्षा वैशिष्ट्ये असलेल्या टणक छताच्या व बंदिस्त प्रवासी कक्षांनीयुक्त तीनचाकी ऑटोरिक्षाचा''

व्याख्या : या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर

क) ''अधिनियम'' याचा अर्थ, मोटार वाहन अधिनियम, १९८८ असा आहे.

ख) ''समुचित प्राधिकरण'' याचा अर्थ, स्कूल बसच्या संदर्भात परवाना देण्याकरिता अधिनियमान्वये प्राधिकृत केलेले प्राधिकरण, असा आहे,

ग) ''कंत्राटी वाहन'' याचा अर्थ, मोटार वाहन अधिनियम १९८८ यात व्याख्या केल्यानुसार असलेले कंत्राटी वाहन असा आहे.

घ) ''शैक्षणिक संस्थेची बस'' याचा अर्थ, मोटार वाहन अधिनियम १९८८ यात व्याख्या केल्यानुसार आहे.

*दिनांक २५/६/२०१२ च्या अधिसूचनेसह शासन अधिसूचना क्रमांक एमव्हीआर ११०९/प्र.क्र. ४२४ / परि–२, दिनांक १३/३/२०१२ मध्ये अधिसूचनेनुसार सुधारणा करण्यात आली.

ड) ''स्कूल बस'' याचा अर्थ, शाळा, महाविद्यालये आणि इतर शैक्षणिक संस्थांकरिता विशेषरित्या रचना केलेली व तयार केलेली कंत्राटी वाहने असा असून त्यामध्ये १२ पर्यंत आसनक्षमता असलेल्या चारचाकी हलक्या मोटार वाहनांचा समावेश असेल.

च) ''परिवहन वाहन'' याचा अर्थ, मोटार वाहन अधिनियम १९८८ यात व्याख्या केल्याप्रमाणे आहे

छ) ''शाळेचे प्राधिकारी'' याचा अर्थ, शाळेचे मुख्याध्यापक, प्राचार्य किंवा शिक्षक असा आहे.

(ज) *''सहवर्ती'' याचा अर्थ, या नियमांच्या प्रयोजनार्थ, स्कूल बसच्या मालकाने शाळा व्यवस्थापनाच्या मान्यतेने नियुक्त केलेली व्यक्ती, असा आहे.

झ) विहीत याचा अर्थ, या अधिनियमान्वये तयार केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे.

त्र) या नियमांमध्ये वापरलेले परंतु व्याख्या न केलेले इतर शब्द आणि वाक्यप्रयोग यांना मोटार वाहन अधिनियम १९८८ यात अनुक्रमे नेमून दिल्याप्रमाणेच अर्थ असेल.

**३. परवान्याची आवश्यकता :** मोटार वाहनाच्या कोणत्याही मालकाला अथवा चालकाला, कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी शाळेतील मुलांची ने–आण करण्याकरिता, त्याच्याकडे अधिनियमाच्या कलम ७४ अन्वये शाळेतील मुलांची ने–आण करण्यासाठी त्या वाहनास परवानगी देणारा वैध कंत्राटी वाहन परवाना असल्याखेरीज, आपल्या वाहनाचा परिवहन वाहन म्हणून वापर करता येणार नाही किंवा वापर करण्यास परवानगी देता येणार नाही. या परवान्यामुळे, त्या वाहनाचा ज्या रितीने वापर होणे अपेक्षित आहे त्याच रितीने, त्या ठिकाणी वाहनाचा वापर करण्यास प्राधिकृत करण्यात येईल.

**४. शाळेतील मुलांची ने–आण करण्याकरिता कंत्राटी वाहन परवाना देणे :** मोटार वाहन अधिनियम १९८८ याच्या कलम ७४, पोटकलम (३) च्या तरतुदींना अधीन राहून, प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, त्याच्याकडे मोटार वाहन अधिनियम १९८८ याच्या कलम ७३ अन्वये केलेल्या अर्जावर, अर्जानुसार अथवा या नियमान्वये घालून दिलेल्या शर्तीस अधीन राहून त्याला योग्य वाटतील असे फेरबदल करून, शाळेतील मुलांची ने–आण करण्यासाठी कंत्राटी वाहन परवाना देईल किंवा असा परवाना देण्याचे नाकारील.

**५. जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समिती :**

१) मुलांची सुरक्षितता आणि शाळेत त्यांची ने–आण करण्याच्या मुद्यांवर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी आणि शिफारस करण्यासाठी, प्रत्येक जिल्ह्याकरिता पोलीस आयुक्त किंवा जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या अध्यक्षतेखाली एक जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समिती असेल आणि (I) जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा जिल्हा परिषदेचा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला त्याचा नामनिर्देशित, (II) पालिका आयुक्त किंवा अतिरिकत पालिका आयुक्त किंवा पालिका उपआयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला त्याचा नामनिर्देशित, (III) पालिका परिवहनचा महाव्यवस्थापक किंवा परिवहन व्यवस्थापक (IV) विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (V) मुख्य अधिकारी, नगरपालिका आणि (VI) जिल्हा परिषदेचा शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक शिक्षण) हे उक्त समितीचे सदस्य असतील, समितीचा अध्यक्ष, शाळा व महाविद्यालये यांचा प्रतिनिधी म्हणून प्रत्येक तालुक्यांमधून एक व्यक्ती नामनिर्देशित करील आणि जिल्ह्याचा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, हा समितीचा सदस्य सचिव असेल. समिती, मुलांची शाळेत ने–आण करण्यातील सुरक्षितता यांच्याशी संबंधित मुद्यांबाबत आढावा घेण्यासाठी व संनियंत्रण करण्यासाठी, **सहा महिन्यातून** किमान एक बैठक घेईल.

---

*दिनांक २५/६/२०१२ च्या अधिसूचनेसह शासन अधिसूचना क्रमांक एमव्हीआर ११०९/प्र.क्र. ४२४ / परि–२, दिनांक १३/३/२०१२ मध्ये अधिसूचनेनुसार सुधारणा करण्यात आली.



RTO PUNE COPYRIGHT

२) शाळेतील मुलांची सुरक्षितपणे ने–आण करणे, परिवहन शुल्क, बस थांबे निश्चित करणे या बाबींकडे लक्ष देण्यासाठी प्रत्येक शाळेची एक परिवहन समिती असेल, आणि ही समिती, वाहनाची कागदपत्रे जसे, नोंदणी प्रमाणपत्र, योग्यता प्रमाणपत्र, विमा प्रमाणपत्र, परवाना, वायू प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र, वाहन चालविण्याचे लायसन, अग्निशामक, प्रथमोपचार पेटी इत्यादींची पडताळणी करील.

या समितीच्या अध्यक्षस्थानी त्या शाळेचा प्राचार्य असेल आणि एक पालक–शिक्षक संघाचा प्रतिनिधी, संबंधित क्षेत्राचा वाहतूक निरीक्षक किंवा पोलीस निरीक्षक, त्या क्षेत्राचा मोटार वाहन निरीक्षक किंवा सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक, शिक्षण निरीक्षक, बसच्या कंत्राटदाराचा प्रतिनिधी आणि स्थानिक प्राधिकरणाचा प्रतिनिधी यांचा समितीत समावेश असेल. समितीची **तीन महिन्यांतून** किमान एकदा प्रत्येक सत्र सुरू होण्याच्या पूर्वी, बैठक घेण्यात येईल.

**६. वाहन तळ आणि वाहन थांबे :** प्रादेशिक परिवहन प्राधिकरण हे शालेय व्यवस्थापन, वाहतूक पोलीस आणि महानगरपालिका किंवा नगरपरिषदेशी विचारविनिमय करून, शाळेच्या वेळा आणि मुलांची सुरक्षितता लक्षात घेऊन, केवळ स्कूल बसकरिता यथोचित ठिकाणी वाहनतळ आणि वाहन थांबे विनिर्दिष्ट करील.

**७(क) शाळेच्या मालकीच्या स्कूल बससंबंधांतील अर्जाचा नमुना :** शाळेच्या मालकीच्या आणि मुलांची ने–आण करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांच्या संबंधांत परवाना देणे आणि त्यांचे नूतनीकरण करणे याकरिता प्रत्येक अर्ज या नियमान्वये अनुसूचीमध्ये विहित केलेल्या नमूना पी.एस.सी.सी.ओ.एस. नुसार असेल.

(ख) शाळेव्यतिरिक्त इतरांच्या मालकीच्या असलेले आणि शाळेचे कंत्राटी वाहन म्हणून वापरण्यात येणाऱ्या वाहनांच्या परवान्यासाठी अर्जाचा नमुना : शाळेव्यतिरिक्त इतरांच्या मालकीच्या असलेल्या आणि शाळेचे कंत्राटी वाहन म्हणून वापरण्यात येणाऱ्या वाहनांच्या संबंधात परवाना देणे आणि त्यांचे नूतनीकरण करणे याकरिता प्रत्येक अर्ज या नियमान्वये अनुसूचीमध्ये विहित केलेल्या नमुना पी.सी.ओ.एस. नुसार असेल.

**८. परवान्याचे नमुना :** क) शाळेच्या मालकीच्या आणि शाळेच्या मुलांची ने–आण करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनाच्या संबंधातील परवाना या नियमान्वये अनुसूचीमध्ये विहित केलेल्या नमुना पी.एस.सी.सी.ओ.एस.ए. नुसार देण्यात येईल.

ख) शाळेव्यतिरिक्त इतरांच्या मालकीच्या असलेल्या आणि शाळेच्या मुलांची ने–आण करण्यासठी शाळेचे कंत्राटी वाहन म्हणून वापरण्यात येणाऱ्या वाहनांच्या संबंधातील परवाना या नियमान्वये अनुसूचीमध्ये विहित केलेल्या नमुना पी.सी.ओ.एस.बी. नुसार देण्यात येईल.

**९. परवाना शुल्क :**

क) शाळेच्या मालकीच्या स्कूल बसकरिता परवाना देण्यासाठी आणि त्याचे नूतनीकरण करण्यासाठी अथवा प्रतिस्वाक्षरीसाठी अर्जाच्या संबंधातील शुल्क – दोनशे रूपये असेल.

ख) कंत्राटी स्कूल बस वाहनाकरिता परवाना देण्यासाठी आणि त्यांचे नूतनीकरण करण्यासाठी अथवा प्रतिस्वाक्षरीसाठी अर्जाच्या संबंधातील शुल्क – दोनशे रूपये असेल.

ग) आसनक्षमता बारापर्यंत असलेल्या चार चाकी हलके मोटार वाहनाच्या संबंधात कंत्राटी वाहन परवान्याकरिता, परवाना देण्यासाठी आणि त्याचे नूतनीकरण करण्यासाठी अथवा प्रतिस्वाक्षरीसाठी अर्जाच्या संबंधातील शुल्क – एकशे पन्नास रूपये असेल.

**१०. स्कूल बस कंत्राट वाहन परवान्यासाठी संलग्न असलेल्या सर्वसाधारण शर्ती :**

१) उक्त परवान्यामध्ये समावेश केलेली वाहने आणि शाळेतील मुलांचे वाहन करण्याकरिता केवळ वापर करण्यात येणारी वाहने यांना **पिवळा** रंग देण्यात येईल आणि वाहनाच्या पुढच्या आणि मागच्या बाजूला ''स्कूल बस'' असे लिहिलेले शब्द दिसले पाहिजेत. तसेच शाळेची ओळख पटण्याकरिता वाहनाच्या खिडकीखाली सर्व बाजूंना १५० मिलीमीटर रूंदीचा विटकरी पट्टा रंगविलेला असेल ज्यावर शाळेचे नाव लिहिलेले असेल.



RTO PUNE COPY RIGHT

लिहिलेले शब्द दिसले पाहिजेत. तसेच शाळेची ओळख पटण्याकरिता वाहनाच्या खिडकीखाली सर्व बाजूंना १५० मिलीमीटर रूंदीचा विटकरी पट्टा रंगविलेला असेल ज्यावर शाळेचे नाव लिहिलेले असेल.

२) शालेय कंत्राटाशिवाय अन्य कोणतेही कंत्राट असलेल्या वाहनांना पिवळा रंग आवश्यक असणार नाही. परंतु वाहनाच्या खिडकीखाली सर्व बाजूंना ४०० मिलीमीटर पिवळ्या पट्टीने रंगविलेले असले पाहिजे.

३) क)* खंड (तीन) मधील दुसऱ्या परंतुकानंतर पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल.

''परंतु, तसेच मुंबई शहर वगळता अन्य बाबतीत, **शाळा व्यवस्थापनाच्या मालकीची असलेली** आणि केवळ स्कूल बस म्हणूनच वापरण्यात येणारी वाहने, त्यांच्या सुरूवातीच्या नोंदणी दिनांकापासून वीस वर्षांपेक्षा अधिक जुनी असता कामा नयेत.''

४) वाहनांसोबत ने–आण करणाऱ्या शाळेतील मुलांची संपूर्ण यादी असेल ज्यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याचे नाव, वर्ग, निवासाचा पत्ता, संपर्क दूरध्वनी किंवा भ्रमणध्वनी क्रमांक, रक्तगट आणि त्याच्या किंवा तिच्या नावासमोर त्याला किंवा तिला चढण्याकरिता व उतरण्याकरिता थांबण्याचे ठिकाण त्याच्या किंवा तिच्या घराजवळील या गोष्टी नमूद केलेल्या असतील. यादीमध्ये मूळ ठिकाण, समाप्तीचे ठिकाण आणि वापरण्यात येणारा तपशिलवार मार्ग दाखवणारा शैक्षणिक संस्थेच्या मुख्य व्यक्तीकडून यथोचितरित्या साक्षांकित केलेला मार्गदेखील नमूद केलेला असेल.

५) * (ख) खंड (पाच) मध्ये पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल.

''परंतु, चालक वगळता, **बारापर्यंत** आसनक्षमता असलेल्या स्कूलबसेसमध्ये सहवर्तींची आवश्यकता असणार नाही. अशा बाबतीत, सहवर्तींची कार्ये चालकाकडून स्वत: पार पाडण्यात येतील.''

६) निकडीच्या प्रसंगी चालक आणि सहवर्ती शाळेच्या प्राधिकाऱ्यांना प्रसंगाची माहिती देतील आणि शाळेतील मुलांच्या सुरक्षेसाठी आवश्यक व्यवस्था करतील.

७) शिशुवर्गातील मुलांच्या बाबतीत जर अधिकृत व्यक्ती (शाळा आणि पालक यांनी परस्पर सहमतीने मान्यता दिलेली व्यक्ती) बस स्टॉपवर मुलाला घ्यायला आली नाही तर, त्या मुलाला पुन्हा शाळेत पाठविण्यात येईल आणि त्याच्या पालकांना बोलावून ते मूल त्यांना घेऊन जाण्यास सांगण्यात येईल.

८) *(ग) खंड (आठ) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल –

''(आठ) स्कूल बसच्या प्रवेशद्वाराच्या सर्वात खालच्या पायरीची उंची जमिनीपासून ३०० मिलीमीटरपेक्षा अधिक नसेल आणि सर्व पायऱ्या न घसरणाऱ्या असल्या पाहिजेत.''

''परंतु, सर्वात खालच्या पायरीची उंची ३५० मिलीमीटरपेक्षा जास्त असेल अशा वापरात असलेल्या बसेसमध्ये एक अतिरिक्त पायरी (घडी होणारी, सरकती अथवा कायमस्वरूपी) बसविणे पुरेसे असेल.''

९) स्कूल बसमध्ये बहिर्वक्र भिंगाचा आरसा असला पाहिजे ज्यामुळे चालक मोटार वाहनाचा बाहेर पडण्याचा दरवाजा व प्रवेश दरवाजा आणि मागील भाग स्पष्ट बघू शकेल आणि चालकाला बसच्या आतील भागातील सर्व दृश्य स्पष्ट दिसू शकेल यासाठी मोठा पूराबोलिक आरसादेखील असेल.

१०) स्कूल बसमध्ये पुढील दरवाजाच्या पायऱ्यांसोबत हाताने धरता येणाऱ्या कठड्याची तरतूद असली पाहिजे जिचा वापर दरवाजातून आत येणे आणि बाहेर पडणे यासाठी करण्यात येईल. हाताने धरता येणाऱ्या कठड्याची उंची, धातू, रचना शासनाने जारी केलेल्या सर्वसाधारण निर्देशांप्रमाणे असेल.

*दिनांक २५/६/२०१२ च्या अधिसूचनेसह शासन अधिसूचना क्रमांक एमव्हीआर ११०९/प्र.क्र. ४२४ / परि–२, दिनांक १३/३/२०१२ मध्ये अधिसूचनेनुसार सुधारणा करण्यात आली.

११) *(घ) खंड (अकरा) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल –

''(अकरा) स्कूल बसमध्ये गँगवेकडील आसनाला खालीलपैकी कोणत्याही एका ठिकाणी, आधारासाठी हँडलची तरतूद असेल –''

(क) आसनाच्या मागच्या बाजूवर (ख) आसनाच्या वरच्या कडेवर (ग) आसनाच्या बाजूला

''परंतु, ज्या बसमध्ये आसनांच्या रचनेत हँडल्स अंतर्भूत आहेत किंवा आगोदरच उभे स्टँचियन पोल बसविण्यात आले आहेत, अशा बसमधील आसनाच्या बाबतीत आधारासाठी अतिरिक्त हँडलची तरतूद करणे आवश्यक असणार नाही.''

(ड) खंड (अकरा) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील –

''(अकरा –क) बसच्या प्रवेशद्वाराला लागून, समोरच्या दिशेस तोंड करून स्टेप वेललगतच्या आसनांजवळ स्कूल बसच्या तळपृष्ठापासून छतापर्यंत एक स्टँचियन पोल व त्या पोलला स्कूल बसच्या कडेपासून जोडणारे, एकावर एक दोन आडवे दांडे ज्यांची उंची बसच्या तळपृष्ठापासून अनुक्रमे ६० व ९० सेंटीमीटर असेल, अशा रितीने बसविणे आवश्यक असेल.

(अकरा ख) अर्ध्या इंच व्यासापेक्षा कमी नसतील असे ॲल्युमिनियम किंवा पावडर कोटेड स्टीलचे आडवे व उभे दांडे अथवा जाळीचा वापर करून बसमधील चालकाच्या आसनाचे क्षेत्र हे प्रवासी कक्षापासून पूर्णपणे स्वतंत्र करण्यात येईल.''

१२) स्कूल बसमध्ये कोणताही प्रेशर हॉर्न जोडलेला नसला पाहिजे किंवा कर्कश आवाज करणारे जे ब्रेक यंत्रणेमधून हवेच्या दाबाने नियंत्रित होत असेल असे अन्य कोणतेही साधन बसवलेले नसले पाहिजे.

१३) *(च) खंड (तेरा) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल –

''(तेरा) (क) महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ याच्या नियम १९२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वस्तूंचा अंतर्भाव असणारी सुसज्ज अशी प्रथमोपचार पेटी स्कूलबसमध्ये बसविलेली असेल.''

(ख) स्कूल बसमध्ये आय. एस. आय. मार्क असलेली ''ए बी सी'' प्रकारची अग्निशामक उपकरणे देखील खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे बसविण्यात येतील.

| वाहनाचा प्रकार | अग्निशामक उपकरणाची क्षमता | अग्निशामक उपकरणांची संख्या | अग्निशामक उपकरण जेथे ठेवावयाची ती जागा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (एक) चालक वगळता १२ आसनापर्यंत आसनक्षमता असलेली स्कूलबस | २ किलो | १ | चालकाच्या कक्षामध्ये किंवा चालकाच्या आसनाजवळ |
| (दोन) चालक वगळता १२ पेक्षा जास्त परंतु २० पेक्षा कमी आसनक्षमता असलेली स्कूलबस | ५ किलो | १ | चालकाच्या कक्षामध्ये |
| (तीन) चालक वगळता २० पेक्षा जास्त आसनक्षमता असलेली स्कूलबस | ५ किलो | २ | चालक कक्षामध्ये एक आणि मागे आपत्कालीन दरवाजाजवळ दुसरे किंवा |

*दिनांक २५/६/२०१२ च्या अधिसूचनेसह शासन अधिसूचना क्रमांक एमव्हीआर ११०९/प्र.क्र. ४२४ / परि–२, दिनांक १३/३/२०१२ मध्ये अधिसूचनेनुसार सुधारणा करण्यात आली.

१४) *(छ) खंड (चौदा) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल.

''(चौदा) आसनाखालील जागेचा वापर दप्तरे ठेवण्यासाठी करण्यात येईल. ब्रेक दाबल्यानंतर दप्तरे पुढे जाऊ नयेत म्हणून आसन बसविण्यासाठी असलेल्या चौकटीच्या पुढील बाजूस तळापासून तीन इंच उंचीचा अर्धा इंच व्यासाचा आडवा रॉड बसविण्यात येईल. बारा आसनक्षमतेपेक्षा जास्त आसनक्षमता असणाऱ्या स्कूल बसेसमध्ये वरच्या बाजूस देखील दप्तरे ठेवण्यासाठी रॅक्स बसविणे आवश्यक असेल.''

''परंतु ज्यांमध्ये आसनांखाली दप्तरांसाठी रॅक्स बसविण्यात आलेल्या असतील अशा वापरात असलेल्या स्कूल बसेसच्या बाबतीत आडव्या रॉडची तरतूद लागू असणार नाही.''

१५) अशा वाहनाच्या चालकाकडे ५ वर्षे वाहन चालविण्याचा अनुभव असला पाहिजे आणि तो परिवहन अनुज्ञाप्तीधारक असला पाहिजे आणि स्कूल बस चालविण्याच्या सेवेत असताना वैध बिल्ला धारण करीत असला पाहिजे.

१६) स्कूल बसमध्ये धोक्याचे इशारे देणारी प्रकाशयोजना (लाईट) असल्या पाहिजेत ज्यामुळे जेव्हा मुले चढताना किंवा उतरताना असे वाहन थांबेल तेव्हा त्या चालू होतील.

१७) *शैक्षणिक संस्थेची बस आणि मध्यम किंवा जड प्रवासी मोटार वाहने शाळेतील विद्यार्थ्यांची ने–आण करण्याच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येत असतील त्याबाबतीत, खिडकीला ४ आडवे स्टीलचे दांडे बसच्या बाहेरील बाजूने जोडलेले असले पाहिजेत, त्या कोणत्याही दोन दांड्यांमधील अंतर हे पाच सेंटीमीटरपेक्षा अधिक असणार नाही अशारितीने ते जोडलेले असले पाहिजेत.

१८) वाहनाला वेगनियंत्रक जोडलेले असले पाहिजे त्यामुळे महानगरपालिकेच्या हद्दींमध्ये वाहनाचा वेग ४० किलोमीटर प्रति तासपेक्षा अधिक असणार नाही आणि महानगरपालिका व्यतिरिक्त हद्दींमध्ये तो ५० किलोमीटर प्रती तासपेक्षा अधिक असणार नाही.

*(झ) खंड (अठरा) मध्ये

(क) ''वाहनाला'' या मजकूरापूर्वी ''राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी अधिसूचीत करील अशा दिनांकापासून'' हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

(ख) ''महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये'' हा मजकूर व ''आणि महानगरपालिकांव्यतिरिक्त हद्दींमध्ये तो ५० किलोमीटर प्रतितासापेक्षा अधिक असणार नाही'' हा मजकूर वगळण्यात येईल.

१९) *(ट) खंड (एकोणीस), नंतर पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल –

''परंतु, बसच्या बांधणीच्या स्वरूपामुळे जर वर निर्दिष्ट केलेल्या आकाराचा फलक किंवा स्टीकर लावणे शक्य नसेल तर, २०० मिलीमीटर × २०० मिलीमीटर या आकाराचा फलक किंवा स्टीकर प्रदर्शित करणे पुरेसे असेल. शाळेत जाणाऱ्या मुलांचे चित्र (एक मुलगी व एक मुलगा) आणि ''स्कूल बस'' हे शब्द यांचे आकार त्या प्रमाणात कमी करण्यात येतील. ''

२०) आसनक्षमता बारापर्यंत असलेल्या चार चाकी हलके मोटार वाहन याव्यतिरिक्त असलेल्या प्रत्येक स्कूल बसवर शाळेची ओळख दर्शविणारा एक फलक दिसेल असा असावा. ज्यावर मार्ग क्रमांक लिहिलेला असावा आणि तो फलक ३० इंच आकाराचा आणि ८ इंच उंचीचा असावा जो पुढे वरच्या बाजूस आणि मागे वरच्या बाजूस दिसेल असा असावा आणि प्रवेशद्वार / बाहेर पडण्याच्या दरवाजावरील फलकाची लांबी १८ इंचाच्या आकाराची आणि उंची ८ इंचाची असावी.

*दिनांक २५/६/२०१२ च्या अधिसूचनेसह शासन अधिसूचना क्रमांक एमव्हीआर ११०९/प्र.क्र. ४२४ / परि–२, दिनांक १३/३/२०१२ मध्ये अधिसूचनेनुसार सुधारणा करण्यात आली.

२१) शाळेतील मुलांची ने–आण करण्याकरिता वापरण्यात येणारे बारापर्यंत आसन क्षमता असलेले प्रत्येक चार चाकी हलके मोटार वाहन यावर शाळेची ओळख दर्शविण्यासाठी आणि वाहनाचा मार्ग क्रमांक ओळखता येण्यासाठी एक फलक असेल जो पुढील बाजूच्या वरच्या भागावर आणि मागच्या बाजूच्या वरच्या भागावर दिसेल. या फलकाची लांबी १८ इंचाच्या आकाराची आणि उंची ८ इंचाची असेल.

२२) महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ याच्या नियम २० च्या तरतुदींचे परवानाधारकाकडून तसेच चालकाकडून काटेकोरपणे पालन करण्यात येईल.

२३) स्कूल बस म्हणून वापरण्यात येणाऱ्या वाहनाची संपूर्ण स्टील बॉडीसह बंद स्वरूपाची बॉडी असेल. कोणत्याही कॅनव्हास हूड असलेल्या वाहनास स्कूल बस म्हणून मान्यता देण्यात येणार नाही. वाहनामध्ये मुलांसाठी लॉक यंत्रणा जोडलेली असावी.

२४) या प्रवर्गाखाली नोंदणी करण्यात आलेली वाहने ही मोटार वाहन अधिनियम, १९८८ व त्याखाली करण्यात आलेले नियम यांच्या तरतुदींनुसार योग्यतेच्या चाचणीच्या अधीन असतील.

२५) जेथे जेथे उपलब्ध असेल तेथे शाळेचे प्राधिकारी, शाळेतील मुलांना वाहनांमधून सुरक्षितपणे उतरण्यासाठी शाळेच्या परिवास्तूमध्ये जागेची तरतूद करतील.

२६) महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ याच्या नियम १०६ च्या तरतुदींनुसार स्कूल बसमध्ये परवानगी देण्यात आलेल्या मुलांची संख्या निर्धारीत करण्यात येईल.

२७) स्कूल बस म्हणून वापरण्यात येणाऱ्या बसमध्ये राज्य परिवहन प्राधिकरणाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेले संकटकालीन बाहेर पडण्याचा दरवाजा किंवा बाहेर पडण्याची खिडकी जोडण्यात येईल.

२८) सर्व स्कूल बस, केंद्र सरकार वेळोवेळी विनिर्दिष्ट करेल त्याप्रमाणे ''बस बॉडी संकल्प चित्र आणि मान्यता – एआयएस–०६३ आणि एआयएस–०५२ याकरिता व्यवसाय संहिता'' याद्वारे विहित केलेल्या आवश्यकतांचे आणि विनिर्देशांचे अनुपालन करतील.

**११. स्कूल बस म्हणून वाहनांच्या प्रतिमानांना मान्यता :** परिवहन आयुक्त, स्कूल बस म्हणून वापरण्यात येतील अशा सर्व वाहनांच्या प्रतिमानांना मान्यता देईल. तसे करताना, परिवहन आयुक्त, मुलांच्या सुरक्षा लक्षात घेऊन उत्पादकाने पुरविलेल्या सुरक्षाविषयक तरतूदींची खातरजमा करील.

**१२. सूट देण्याचा अधिकार :** राज्य शासनास लेखी कारणे दिल्यानंतर एका किंवा त्यापेकी कोणत्याही शर्तीमधून स्कूल बस म्हणून नोंदणी झालेल्या वाहनांना सूट देता येईल.

RTO PUNE COPY RIGHT

**महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार – अ, मार्च २२, २०११ / चैत्र १, शके १९३३**

## अनुसूची
## नमुना – पी.एससी.सीओ.एस
## (नियम ७ (क) पहा)
## शाळेच्या मालकीच्या आणि मुलांची ने–आण करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांच्या संबंधांत परवाना मिळण्याकरिता व त्यांचे नूतनीकरण करण्याकरिता अर्ज

**(स्कूल बस)**

प्रति,
उप / सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी
.....................................................
.....................................................

मोटार वाहन अधिनियम, १९८८ याच्या कलम ६९, ७० आणि ७१ च्या तरतुदींना अनुसरून, मी खाली सही करणार याद्वारे खाली सही करणाऱ्याच्या मालकीच्या असलेल्या व शाळेतील मुलांची ने–आण करण्यासाठी भाडेतत्वावर किंवा मोबदला देऊन वापरण्यात येणाऱ्या स्कूल बसच्या /स्कूल व्हॅनच्या संबंधात अधिनियमाच्या कलम ६६ अन्वये परवाना मिळण्याकरिता अर्ज करीत आहे.

१) अर्जदाराचे / कंपनीचे पूर्ण नाव : ______________________________

(आडनाव) (नाव) (वडिलांचे /पतीचे नाव)

२) वय : ______________________________

३) संपूर्ण पत्ता : ______________________________

४) दूरध्वनी क्रमांक : ______________________________

५) ज्याकरिता परवाना आवश्यक आहे ते क्षेत्र किंवा मार्ग : ______________________________

६) शाळेचे नाव व शाळेची वेळ :

१) ______________________________

२) ______________________________

३) ______________________________

४) ______________________________

७) मी/आम्ही यासोबत शाळेबरोबर केलेल्या सामाईक प्रमाणित करारपत्राची प्रत आणि मोटार वाहन क्रमांक......... ........................................................ द्वारे ने–आण करावयाच्या प्रस्तावित मुलांची यादी जोडली आहे.

८) आसन क्षमता : ______________________________

९) वाहन प्रकार : ______________________________

१०) राज्यात किंवा इतरत्र वैध असलेला आणि अर्जदार पुढील वाहनांच्या संबंधात धारण करत असलेल्या कोणत्याही राज्य वाहन परवान्याचा अथवा कंत्राटी वाहन परवान्याचा तपशिल

RTO PUNE COPY RIGHT

क) हे वाहन ____________________

ख) अन्य कोणतेही वाहन ____________________

११) कोणत्याही राज्यात मागील चार वर्षांमध्ये कोणत्याही निलंबनाचा किंवा रद्द करण्याच्या आदेशाच्या अधीनतेने कोणत्याही परिवहन वाहनाचा वापर करण्यासाठी अर्जदाराकडे असलेल्या परवान्याचा तपशिल :

१२) सदर वाहनाचा ताबा माझ्याकडे असून त्याच्या नोंदणीचे प्रमाणपत्र यासोबत जोडत आहे.

१३) मला अद्याप वाहनाचा ताबा मिळालेला नाही आणि तो मिळेपर्यंत आणि नोंदणीचे प्रमाणपत्र सादर करेपर्यंत मला परवाना मिळणार नाही हे मी जाणतो तसेच मी जाहीर करतो की, ....................... या वर्षामध्ये निर्माण केलेले वाहन खरेदी करणार आहे.

१४) माझा वाहन क्रमांक ................. चालवण्याचा उद्देश आहे. माझा मोटार वाहन अनुज्ञाप्ती क्रमांक................. ............................ आहे ............................. यांनी दिलेला पी.एस.व्ही.ए. क्रमांक ......................... आहे.

१५) मी याद्वारे असे जाहीर करतो की, वर दिलेली माहिती सत्य असून मला देण्यात आलेल्या कोणत्याही परवान्याच्या शर्ती मला मान्य आहेत असे मी कबूल करतो.

दिनांक :

ठिकाण :

अर्जदाराची सही आणि अंगठ्याचा ठसा

**(परिवहन प्राधिकरण कार्यालयाने भरावयाचे)**

१. अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक

२. पावती क्रमांक दिनांक

अन्वये रूपये इतकी रक्कम मिळाली

पुढील सदस्यांमध्ये फिरविले

३. दिनांक रोजीच्या बैठकीत विचारार्थ घेतले

४. सुधारित रूपात दिनांक रोजी परवानगी दिली / परवानगी नाकारली

५. दिलेल्या परवान्याचा क्रमांक

सचिव
परिवहन प्राधिकरण

RTO PUNE COPY RIGHT

**नमुना – पी.सीओ.एस**
**(नियम ७ (ख) पहा)**
**शाळेव्यतिरिक्त इतरांच्या मालकीच्या असलेल्या आणि शाळेने कंत्राटी तत्वावर घेतलेल्या व शाळेतील मुलांची ने–आण करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांसंदर्भात, परवाना मिळण्याकरिता व त्याचे नूतनीकरण करण्यासाठी अर्ज**

**(स्कूल बस)**

प्रति,
उप / सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी
.....................................................
.....................................................

मोटार वाहन अधिनियम, १९८८ याच्या कलम ६९, ७० आणि ७१ च्या तरतुदींना अनुसरून, मी खाली सही करणार याद्वारे खाली सही करणाऱ्याच्या मालकीच्या असलेल्या व शाळेतील मुलांची ने–आण करण्यासाठी भाडेतत्वावर किंवा मोबदला देऊन वापरण्यात येणाऱ्या स्कूल बसच्या /स्कूल व्हॅनच्या संबंधात अधिनियमाच्या कलम ६६ अन्वये परवाना मिळण्याकरिता अर्ज करीत आहे.

१) अर्जदाराचे / कंपनीचे पूर्ण नाव : ____________________
(आडनाव) (नाव) (वडिलांचे /पतीचे नाव)

२) वय : ____________________

३) संपूर्ण पत्ता : ____________________

४) दूरध्वनी क्रमांक : ____________________

५) ज्याकरिता परवाना आवश्यक आहे ते क्षेत्र किंवा मार्ग : ____________________

६) शाळेचे नाव व शाळेची वेळ :
१) ____________________
२) ____________________
३) ____________________
४) ____________________

७) मी/आम्ही यासोबत शाळेबरोबर केलेल्या सामाईक प्रमाणित करारपत्राची प्रत आणि मोटार वाहन क्रमांक......... ....................................................... द्वारे ने–आण करावयाच्या प्रस्तावित मुलांची यादी जोडली आहे.

८) आसन क्षमता : ____________________

९) वाहन प्रकार : ____________________

१०) राज्यात किंवा इतरत्र वैध असलेला आणि अर्जदार पुढील वाहनांच्या संबंधात धारण करत असलेल्या कोणत्याही राज्य वाहन परवान्याचा अथवा कंत्राटी वाहन परवान्याचा तपशिल

RTO PUNE COPY RIGHT

क) हे वाहन ______________________________

ख) अन्य कोणतेही वाहन ______________________________

११) कोणत्याही राज्यात मागील चार वर्षांमध्ये कोणत्याही निलंबनाचा किंवा रद्द करण्याच्या आदेशाच्या अधीनतेने कोणत्याही परिवहन वाहनाचा वापर करण्यासाठी अर्जदाराकडे असलेल्या परवान्याचा तपशिल :

१२) सदर वाहनाचा ताबा माझ्याकडे असून त्याच्या नोंदणीचे प्रमाणपत्र यासोबत जोडत आहे.

१३) मला अद्याप वाहनाचा ताबा मिळालेला नाही आणि तो मिळेपर्यंत आणि नोंदणीचे प्रमाणपत्र सादर करेपर्यंत मला परवाना मिळणार नाही हे मी जाणतो तसेच मी जाहीर करतो की, ........................ या वर्षामध्ये निर्माण केलेले वाहन खरेदी करणार आहे.

१४) माझा वाहन क्रमांक ................. चालवण्याचा उद्देश आहे. माझा मोटार वाहन अनुज्ञाप्ती क्रमांक................. ............................ आहे ............................. यांनी दिलेला पी.एस.व्ही.ए. क्रमांक .......................... आहे.

१५) मी याद्वारे असे जाहीर करतो की, वर दिलेली माहिती सत्य असून मला देण्यात आलेल्या कोणत्याही परवान्याच्या शर्ती मला मान्य आहेत असे मी कबूल करतो.

दिनांक :

ठिकाण :

अर्जदाराची सही आणि अंगठ्याचा ठसा

**(परिवहन प्राधिकरण कार्यालयाने भरावयाचे)**

१. अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक

२. पावती क्रमांक दिनांक

अन्वये रूपये इतकी रक्कम मिळाली

पुढील सदस्यांमध्ये फिरविले

३. दिनांक रोजीच्या बैठकीत विचारार्थ घेतले

४. सुधारित रूपात दिनांक रोजी परवानगी दिली / परवानगी नाकारली

५. दिलेल्या परवान्याचा क्रमांक

सचिव
परिवहन प्राधिकरण



RTO PUNE COPY RIGHT

**महाराष्ट्र शासन राजपत्र असाधरण भाग चार – अ, मार्च २२, २०११ / चैत्र १, शके १९३३**

**नमुना – पी.एससी.सीओ.एस.ए.**

**(नियम ८ (क) पहा)**

**शाळेच्या मालकीच्या आणि शाळेतील मुलांची ने–आण करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांच्या संबंधातील परवाना**

**(स्कूल बस)**

**परिवहन प्राधिकरण**

**पी.एससी.सीओ.एस.ए. (क्रमांक)**

१. धारकाचे नाव : ______________________

(आडनाव) (नाव) (वडिलांचे / पतीचे नाव)

२. पत्ता ______________________

३. ज्यासाठी परवाना वैध आहे तो मार्ग / क्षेत्र : ______________________

४. नैमित्तिक कंत्राट वाहन म्हणून वापरण्यात येणाऱ्या वाहनाचा किंवा वाहनांचा प्रकार आणि ( ______________________ ) आसन क्षमता :

(१) नोंदणी चिन्ह

(२) चेसिस क्रमांक

आसन क्षमता असलेली वाहने

आसन क्षमता असलेली वाहने

५. परवाना समाप्त होण्याचा दिनांक :

६. हा परवाना अधिनियमाच्या कलम ८४ मध्ये व स्कूल बसकरिता विनियम, २०१० च्या नियम १० मध्ये घालून दिलेल्या शर्तीच्या अधीन असेल.

(क) प्रादेशिक परिवहन प्राधिकरण एक महिन्यापेक्षा कमी नसेल इतकी आगाऊ नोटीस देऊन

(१) परवान्याच्या शर्तीमध्ये बदल करील (२) परवान्याकरिता आणखी शर्ती जोडील

(ख) अन्य कोणत्याही शर्ती

७. या परवान्यात धारकास कोणत्याही प्रकारचे वाहन, टप्पा वाहन किंवा भाडेतत्वावरील माल वाहन म्हणून वापर करण्याचा हक्क असणार नाही.

सचिव

परिवहन प्राधिकरण

दिनांक :

**नूतनीकरण :** शर्तीच्या अधीन राहून पर्यंत नूतनीकरण करण्यात आले.

येथे देखील वैध असेल.

सचिव

परिवहन प्राधिकरण

दिनांक :

RTO PUNE COPY RIGHT

**नमुना – पी.सीओ.एस.बी.**

**(नियम ८ (ख) पहा)**

**शाळेव्यतिरिक्त इतरांच्या मालकीच्या असलेल्या आणि शाळेने कंत्राटी तत्वावर घेतलेल्या व शाळेतील मुलांची ने–आण करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांसंदर्भातील परवाना.**

**(स्कूल बस)**

**परिवहन प्राधिकरण**

**पी.सीओ.एस.बी. (क्रमांक)**

१. धारकाचे नाव : ____________________

(आडनाव) (नाव) (वडिलांचे / पतीचे नाव)

२. पत्ता ____________________

३. ज्यासाठी परवाना वैध आहे तो मार्ग / क्षेत्र : ____________________

४. नैमित्तिक कंत्राट वाहन म्हणून वापरण्यात येणाऱ्या वाहनाचा किंवा वाहनांचा प्रकार आणि ( ____________________ ) आसन क्षमता :

(१) नोंदणी चिन्ह

(२) चेसिस क्रमांक

आसन क्षमता असलेली वाहने

५. परवाना समाप्त होण्याचा दिनांक :

६. हा परवाना अधिनियमाच्या कलम ८४ मध्ये व स्कूल बसकरिता विनियम, २०१० च्या नियम १० मध्ये घालून दिलेल्या शर्तीच्या अधीन असेल.

(क) प्रादेशिक परिवहन प्राधिकरण एक महिन्यापेक्षा कमी नसेल इतकी आगाऊ नोटीस देऊन

(१) परवान्याच्या शर्तीमध्ये बदल करील (२) परवान्याकरिता आणखी शर्ती जोडील

(ख) अन्य कोणत्याही शर्ती

७. या परवान्यात धारकास कोणत्याही प्रकारचे वाहन, टप्पा वाहन किंवा भाडेतत्वावरील माल वाहन म्हणून वापर करण्याचा हक्क असणार नाही.

सचिव
परिवहन प्राधिकरण

दिनांक :

**नूतनीकरण :** शर्तीच्या अधीन राहून पर्यंत नूतनीकरण करण्यात आले.

येथे देखील वैध असेल.

सचिव

दिनांक : परिवहन प्राधिकरण

सुमीत मल्लिक

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने शासनाचे प्रधान सचिव

RTO PUNE COPY RIGHT

क्र.पआ/का-३/इतर/३२६९/१०
परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, ३/४ मजला, डॉ. आंबेडकर
उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०००५१.
दिनांक : ३०/११/२०१०

प्रति,
सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी,
सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी.

**विषय : शालेय विद्यार्थी वाहतुकीसाठी बस मुंबई मोटार वाहन कर अधिनियम १९५८ अंतर्गत करमाफी अधिसुचना दि. १६ ऑक्टोबर, २०१०**

**संदर्भ : शासन पत्र क्र. एमटीए १७१०/प्र.क्र.२१३/परि-३, दि. २७/१०/२०१०**

उपरोक्त विषयांवरील संदर्भाधीन पत्रासोबत प्राप्त झालेल्या शालेय विद्यार्थी वाहतुकीसाठी बस मुंबई मोटार वाहन कर अधिनियम १९५८ अंतर्गत करमाफी अधिसुचना क्र. एमटीए १७१०/प्र.क्र.२१३/परि-३, दि. १६ ऑक्टोबर, २०१० ची मराठी व इंग्रजी प्रत सोबत पाठविण्यात येत आहेत.

सर्व कराधान प्राधिकाऱ्यांनी यांची नोंद घेऊन तात्काळ कार्यवाही सुरु करावी. तसेच सदर अध्यादेशाची प्रत ई-मेल द्वारे पाठविण्यात येत आहे.

परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

सोबत : दि. १६ ऑक्टोबर, २०१० ची अधिसुचना

प्रत : १) सर्व नियंत्रक अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीसाठी.

२) प्रा.प.अ./स.प्रा.प.अ./क.ले.प./व.नी. यांना

माहितीस्तव कार्यवाहीस्तव

परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

RTO PUNE COPY RIGHT

**महाराष्ट्र शासन राजपत्र**
**असाधारण भाग चार – ब**
**(वर्ष ३, अंक ३) सोमवार, ऑक्टोबर १८, २०१०/आश्विन २६, शके १९३२ (पृष्ठे ४)**
**किंमत : रूपये २८.००**

**असाधारण क्रमांक १४०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक – अ आणि एक – ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ ऑक्टोबर २०१०**

**अधिसूचना**

मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८

क्रमांक एमटीए. १७१०/प्र.क्र.२१३/परि–३, मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ६५) याच्या कलम १३ च्या पोट–कलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन आणि शासकीय अधिसूचना, गृह विभाग, क्रमांक एमटीए, १७८९/१५/परि–३, दिनांक २७ जुलै १९८९ अधिक्रमित करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, दिनांक ३० ऑक्टोबर २०१० पासून यासोबत जोडलेल्या अनुसूचिच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वाहनांना, त्यांच्या मर्यादेपर्यंत स्तंभ (३) मध्ये त्या प्रत्येकासमोर अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत उक्त अधिनियमान्वये कर बसविण्यापासून अंशतः सूट देत आहे.

| अ.क्र. (१) | मोटार वाहनाचा प्रवर्ग (२) | करातुन सुट देण्याची मर्यादा (३) |
|---|---|---|
| १. | शालेय प्राधिकरणाच्या मालकीच्या आणि केवळ स्कूल बस म्हणून वापरण्यात येणाऱ्या स्कूल बस | प्रति वर्ष प्रति आसन रुपये १००/– पेक्षा अधिक असणारा कर |
| २. | शालेय प्राधिकरणाने कंत्राटी पद्धतीने घेतलेल्या आणि केवळ स्कूल बस म्हणून वापरण्यात येण्याऱ्या स्कूल बस | प्रति वर्ष प्रति आसन रुपये १००/– पेक्षा अधिक असणारा कर |
| ३. | केवळ शाळेतील मुलांची ने–आण करण्यासाठी शालेय प्राधिकरणाव्यतिरिक्त इतरांची मालकी असलेल्या किंवा कंत्राटी पद्धतीने घेतलेल्या स्कूल बस | देय असलेल्या वार्षिक कराच्या २/३ इतका कर |
| ४. | शालेय प्राधिकरणाने कंत्राटी पद्धतीने घेतलेल्या स्कूल बस आणि स्कूल बस म्हणून तसेच शाळेच्या सुट्टीच्या दिवशी किंवा शाळेच्या वेळेव्यतिरिक्त बाहेर नियमित तत्वावर इतर प्रयोजनाकरिता कंत्राटी पद्धतीने वहन करणाऱ्या स्कूल बस | संबंधित तिमाहीकरिता लागू असलेल्या तिमाही दराच्या १/३ इतका कर. |

RTO PUNE COPY RIGHT

| अ.क्र.<br>(१) | मोटार वाहनाचा प्रवर्ग<br>(२) | करातुन सुट देण्याची मर्यादा<br>(३) |
|---|---|---|
| ५. | शालेय प्राधिकरणाने केवळ त्यांच्या प्रयोजनासाठी कंत्राटी पद्धतीने घेतलेल्या परंतु अन्य कोणत्याही प्रयोजनाकरिता वर्षभरात केवळ एकदाच वापरलेल्या स्कूल बस. | संबंधित तिमाहीकरिता लागू असलेल्या तिमाही दराच्या १/३ इतका कर. |
| ६. | नाटक कंपन्या, लोकनाट्य किंवा तमाशा मंडळे आणि एखादा वाद्यवृंद यांच्या मालकीच्या बस. | लागू असलेल्या वार्षिक कराच्या २/३ इतका कर. |

२. उपरोक्त कराची सूट, संबंधित वाहनाच्या प्रकाराकरिता लागू असलेल्या वार्षिक कराच्या दरास अनुसरून लागू असेल आणि वाहनाचा उपरोक्त विनिर्दिष्ट प्रयोजनाकरिता जोपर्यंत वापर करण्यात येत असेल तोपर्यंत परिणामक असेल.

३. कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने मोटार वाहनांवर कर बसविला असेल तर अशा स्थानिक प्राधिकरणाच्या हद्दीमध्ये वापर करण्याकरिता नोंदणी केलेल्या मोटार वाहनांच्या कराचे दर हे कराच्या दरांच्या दोन–तृतीयांश इतके असतील आणि संबंधित वाहनांच्या प्रकारांना लागू असलेल्या अशा दरांना अनुसरून, उपरोक्त कराची सूट लागू असेल.

स्पष्टीकरण : या अधिसुचनेच्या प्रयोजनार्थ स्कूल बसच्या शब्दप्रयोगात, मुलांची किंवा विद्यार्थ्यांची ने–आण करण्यासाठीच्या आणि वापर करण्यासाठी व माध्यमिक शिक्षण स्तरापर्यंतच्या शाळेतील मुलांची किंवा विद्यार्थ्यांची ने–आण करण्यासाठी, नोंदणी केलेल्या चारचाकी मोटार वाहनाचा समावेश होतो.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज्यो. मा. चव्हाण,**
शासनाचे उप सचिव

RTO PUNE COPY RIGHT



# शाळेतील विद्यार्थ्यांना ने-आण करणाऱ्या बस बाबतच्या सूचना

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
शासन निर्णय क्र.पीआरई–२००८/(५०६/११)/प्राशि–१,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई – ४०००३२.

**दिनांक १४ सप्टेंबर २०११**

**पहा :– शासन निर्णय, गृह विभाग क्र. एमव्हीआर–०८०८/सीआर–१५३/परि–२, दि. २३/७/२००८**

**प्रस्तावना :** मुंबई शहरात शालेय विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित, सुनियोजित व कार्यक्षम बससेवा सुरू करण्यासाठी शासन निर्णय, गृह विभाग क्र. एमव्हीआर–०८०८/सीआर–१५३/परि–२, दि. २३/७/२००८ अन्वये परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केलली असून त्या समितीने शिफारस केल्यानुसार शासनाने स्कूल बसकरिता महाराष्ट्र मोटार वाहन नियम, २०१० तयार केला असून त्यास मंत्रिमंडळाने दि. २४/६/२०१० रोजी मान्यता दिलेली आहे. या नियमावली अंतर्गत स्कूल बस नियम आणि विनियम, २०११ प्रमाणे शालेय शिक्षण विभागामार्फत सर्व शाळांना, शाळेतील विद्यार्थ्यांना ने–आण करणाऱ्या बसबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :** स्कूल बसकरिता महाराष्ट्र मोटार वाहन नियम, २०१० अंतर्गत राज्यामध्ये शालेय विद्यार्थ्यांना शाळेत जाण्याकरिता सुनियोजित, सुरक्षित वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी संबंधितांना, शासन खालीलप्रमाणे स्कूल बस नियम आणि विनियम, २०११ निश्चित करीत आहे.

क) शाळेतील मुलांची सुरक्षितपणे ने–आण करणे, परिवहन शुल्क, बस थांबे निश्चित करणे, या बाबींकडे लक्ष देण्यासाठी प्रत्येक शाळेची एक परिवहन समिती असेल आणि ही समिती वाहनाची कागदपत्रे, जसे– नोंदणी प्रमाणपत्र, योग्यता प्रमाणपत्र, विमा प्रमाणपत्र, परवाना, पीयुसी, वाहनाची अनुज्ञाप्ती (Driving Licence), अग्निशमन यंत्रणा, प्रथमोपचार सुविधा आणि या नियमांच्या परिशिष्ट २ मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसा सामायिक प्रमाणित करारपत्र (कंत्राट) इत्यादींची पडताळणी करील.

या समितीच्या अध्यक्षस्थानी त्या शाळेचे मुख्याध्यापक / प्राचार्य असतील आणि एक पालक – शिक्षक संघाचे प्रतिनिधी, संबंधित क्षेत्राचा वाहतूक निरीक्षक / पोलीस निरीक्षक, शिक्षण निरीक्षक किंवा शिक्षण अधिकारी यांचे प्रतिनिधी, बसच्या कंत्राटदाराचा प्रतिनिधी आणि स्थानिक प्राधिकरणाचा प्रतिनिधी यांचा समितीत समावेश असेल, समितीची तीन महिन्यातून किमान एकदा आणि प्रत्येक सत्र सुरू होण्याच्यापूर्वी बैठक घेण्यात येईल.

ख) शाळेतील मुलांच्या सुरक्षित प्रवासासाठी शाळेचे मुख्याध्यापक / प्राचार्य जबाबदार असतील आणि शाळेतील मुलांची ने–आण करताना ती कशी केली जाते, याकडे दररोज लक्ष पुरविण्यासाठी आवश्यक पाऊले उचलतील.

ग) शाळेचे प्राधिकारी, शाळेचे सत्र सुरू होण्यापूर्वी वर्षातून दोन वेळा, एक दिवसीय प्रथमोपचार उजळणी पाठ्यक्रम घेण्यास उत्तरदायी असतील.

घ) शाळेचे प्राधिकारी, शाळा सुरू होण्याच्या आणि सुटण्याच्या वेळेला मुलांना सुरक्षितपणे जाता यावे म्हणून वाहतूक पोलिसांशी विचारविनिमय करून वाहतूकीचे नियमन करण्यासाठी पुरेशा संख्येत वाहतूक रक्षक नियुक्त करतील.

ड) शाळेच्या प्रशासकांनी वाहतूक पोलिसांशी विचारविनिमय करून आणि त्यांच्या व स्थानिक प्राधिकरणाच्या मदतीने शाळेजवळ आवश्यक ती चिन्हांकने आणि खुणा लावण्यात येतील. याची खबरदारी घ्यावी.

च) शाळेच्या ''आत'' येण्याच्या आणि ''बाहेर'' जाण्याच्या फाटकासमोर १०० मीटर परिसरात शाळेचे कंत्राटी वाहन असल्याचा परवाना नसलेली कोणतीही खाजगी वाहने, ऑटोरिक्षा आणि टॅक्सी थांबवण्यास शाळेच्या कोणत्याही प्राधिकाऱ्याने अथवा वाहतूक प्राधिकाऱ्याने परवानगी देवू नये.

छ) किमान एम.बी.बी.एस. किंवा त्यावरील शैक्षणिक आर्हता धारण करणाऱ्या डॉक्टरने चालकाचे आरोग्य प्रमाणित करणारे आणि नेत्ररोग तज्ञाने त्याच्या दृष्टीबाबत दिलले नमुना एक–क मधील वैद्यकीय प्रमाणपत्र वाहन चालकाने दरवर्षी सादर करावे. संबंधित शाळा व्यवस्थापकाने आणि / अथवा वाहतूकदाराने, वाहनचालकाने असे प्रमाणपत्र देण्यास कसूर केल्यास त्या चालकाला वाहन चालविण्यास प्रतिबंध करावा आणि ही बाब वैधानिक प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

ज) प्रत्येक शालेय प्रशासनाने त्यांच्या शाळेमधील मुलांची / मुलींची योग्य रकमेची सर्व समावेश विमा पॉलिसी काढावी. शालेय प्रशासनाने विम्याच्या हप्त्यासाठी देय असणारी रक्कम विद्यार्थ्यांच्या शालेय शुल्कातून वसूल करावी.

झ) वाहनचालक, महिला सहायक आणि स्वच्छक यांच्या ओळखीसाठी विभेदक गणवेश विहित करावा. कर्तव्यार्थ कर्मचाऱ्याने लावण्यासाठी चालकाने ओळखपत्र द्यावे.

त्र) प्रथमोपचार पेटी आणि आवश्यक ती औषधे व साधने वाहनामध्ये ठेवावीत आणि ते तसे ठेवले आहेत, याची प्राचार्याने / अधिकृत व्यक्तीने दर महिन्याला तपासणी करावी.

ट) विद्यार्थ्यांचा रक्तगट आणि आणीबाणीच्या वेळी संबंधितांशी संपर्क साधण्यासाठी दूरध्वनी क्रमांक याची माहिती प्रत्येक स्कूलबसमध्ये असावी.

ठ) कंत्राटावर घेतलेल्या प्रत्येक स्कूल बसमध्ये एबीसी प्रकारची ५ किलो क्षमतेची आणि प्रत्येकावर आयएसआय चिन्ह असलेली दोन अग्निशमके ठेवली आहेत, याची शालेय प्राधिकाऱ्याने खात्री करून घ्यावी. यापैकी एक वाहनचालकाच्या केबिनमध्ये आणि दुसरे बसच्या (संकटकाळी बाहेर पडावयाच्या) आपातकालीन दरवाजाजवळ ठेवलेले असावे. तसेच प्रथमोपचार व अग्निशमन यंत्रणा चालविण्याचे प्रशिक्षण वाहक, वाहन सहायक आणि वाहनचालक यांना देणे बंधनकारक राहील.

ढ) स्कूल बसचालकाने सामायिक प्रमाणित करारपत्रामध्ये (कंत्राट) शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या आणि शाळेच्या प्राधिकाऱ्यांनी व चालकाने परस्पर संगतीने मान्य केलेल्या अटी व शर्तींचे पालन करावे. या अटी व शर्ती दोघांनाही बंधनकारक असतील.

ण) शाळेसाठी कंत्राटी तत्वावर वापरण्यात येणाऱ्या प्रत्येक वाहनामध्ये वाहन चालविण्याचे लायसेन्स, परवाना, पात्रता प्रमाणपत्र, विमा प्रमाणपत्र, पीयुसी प्रमाणपत्र हे नेहमी सोबत ठेवावे.

न) बसमालकाने शाळेच्या वेळांचे काटेकोर पालन करावे.

ज्ञ) शाळेने विनिर्दिष्ट केलेले मार्ग व बस थांबे यांचे काटेकोरपणे पालन वाहन चालकाने / बस सहायकाने करावे.

त) बसमार्ग क्रमांक बसच्या दर्शनी भागावर ठळकपणे दिसतील असे लावावेत.

थ) कामावर असताना कोणत्याही कर्मचाऱ्याने धुम्रपान अथवा मद्यपान करू नये.

द) मुलांना बसमध्ये चढताना व उतरताना महिला सहायक / स्वच्छक यांनी मदत करावी. त्यांनी मुलाला घ्यायला येणाऱ्या सहायकाचे ओळखपत्र देखील तपासावे. ज्युनिअर के.जी. आणि सिनिअर के.जी. तसेच प्राथमिक / माध्यमिक शाळेतील मुलांना ठरलेल्या ठिकाणी पालकांनी किंवा अधिकृत व्यक्तींनी उतरवून घ्यावे. जर त्यांना कोणी



RTO PUNE COPY RIGHT

उतरवून घ्यायला येणार असल्याची त्यांच्या ओळखपत्रावर खूण असेल आणि कोणी घ्यायला आले नाही तर त्या मुलाला शाळेत परत आणावे.

ध) शाळेतील मुलांची ने–आण करताना कोणत्याही कर्मचाऱ्याने बसमध्ये संगीत / गाणे लावू नयेत.

प) शाळेने तशी तरतूद केलेली असेल त्याखेरीज, बसच्या कर्मचाऱ्यांनी मुलांना कोणतेही खाद्यपदार्थ अथवा पेय देवू नयेत.

फ) वाहतूक करणाऱ्याने बंद / वाहतूक कोंडी / अपघात / बिघाड / रस्ताबंद इत्यादींच्या वेळी बसमध्ये कोणताही बदल झाल्यास तसे ताबडतोब शाळेला कळवावे. कंत्राटाकडे अशा निकडीच्या वेळी पुरेशी पर्यायी व्यवस्था उपलब्ध आहे, याची शाळेने खात्री करून घ्यावी.

ब) वाहतूक करणाऱ्याने किंवा त्याच्या पर्यवेक्षकाने कोणत्याही अनियमित घटना ताबडतोब शाळेला कळवाव्यात.

भ) बस चालू असताना बसचे दरवाजे नेहमी कडी लावून बंद ठेवावेत.

य) बसचा आतील भाग नियमितपणे स्वच्छ करावा. प्रत्येक बसमध्ये एअर फ्रेशनर ठेवावे.

र) स्वच्छक आणि महिला सहायकाने बसमधील विद्यार्थी सुरक्षित आणि सुखरूप आहेत तसेच बसमधील स्वच्छता याकडे कायम लक्ष ठेवावे.

ल) नियमांचे उल्लंघन केल्यास, वैधानिक प्राधिकरणाने दिलेल्या शिक्षेखेरीज सी.एस.ए. नुसार दंडही आकारण्यात येईल.

२. सामायिक प्रमाणित करारपत्र (सी.एस.ए.) रू. १००/– एवढे मुद्रांक शुल्क असलेल्या गैर न्यायिक बंधपत्रावर करण्यात येईल. पालक व विद्यार्थी यांना हे करारपत्र शाळेचे बस सेवा पुरविणारे व्यवस्थापन पूर्वपरवानगीने पडताळणीसाठी उपलब्ध करेल.

वरील नियमात वेळोवेळी आवश्यक ते बदल करता येतील. या नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक अर्जाचे नमुने खालील नमूद सोबतच्या परिशिष्टाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | शालेय बस सेवा सुरू करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे | परिशिष्ट अ |
| २) | बस सेवा सुरू करण्यासाठी मुख्याध्यापक / प्राचार्य यांचे परिपत्रक | परिशिष्ट ब |
| ३) | बस फीबाबत | परिशिष्ट क |
| ४) | बस सेवेसाठी विद्यार्थी / पालक यांचा अर्ज | परिशिष्ट ड |
| ५) | विद्यार्थ्यांची माहिती विवरणपत्र | परिशिष्ट इ |
| ६) | शाळांच्या बसबाबतचे नियम | परिशिष्ट फ |
| ७) | सामायिक प्रमाणित करारनामा | परिशिष्ट २ |
| ८) | सामायिक करारनाम्यासोबतचे जोडपत्र जे वेळोवेळी अद्ययावत करावयाचे आहे. | परिशिष्ट २.१ |

३. याबाबतची अधिसूचना यथावकाश निर्गमित करण्यात येईल.

**४. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०११०९०३१७३००६००१ असा आहे.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(ना.उ. रौराळे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

RTO PUNE COPY RIGHT

प्रति,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक
मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे स्वीय सहाय्यक
सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
सर्व आयुक्त, महानगरपालिका
सर्व विधानपरिषद सदस्य
सर्व विधानसभा सदस्य
कक्ष अधिकारी, ग्रंथालय, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई (१० प्रती)
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिद्धीच्या विनंतीसह ५ प्रती)
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ(बालभारती) पुणे
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/प्रौढ), जिल्हा परिषद तथा सदर अधिकाऱ्यांमार्फत संबंधित सर्व शाळांचे मुख्याध्यापक
सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपरिषद
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपरिषद / कटकमंडळे
शिक्षण निरीक्षक (दक्षिण / पश्चिम / उत्तर), बृहन्मुंबई
निवड नस्ती, का. प्राशि - १.

RTO PUNE COPY RIGHT

## परिशिष्ट अ

## बससेवा सुरू करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे

### भाग – १

शाळेचे मुख्याध्यापक / प्राचार्य पालकांना बससेवा सुरु करत असल्याबाबत व बससेवेची आवश्यकता असल्यास विद्यार्थ्याची तपशिलवार माहिती विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे विद्यार्थी निवास अर्जामध्ये शाळेला कळविण्याबाबत पत्राद्वारे कळवतील.

शाळेला बस व्यवस्थापन कक्षाने करावयाची कार्यवाही

अ) सर्व विद्यार्थ्यांच्या प्राप्त अर्जावरून वास्तव्याचे क्षेत्र निश्चित करून विद्यार्थ्यांना बसमध्ये घेण्याचे व सोडण्याचे सामायिक थांबे निश्चित करणे.

ब) शाळेच्या वेळेप्रमाणे बसचे मार्ग व वेळ निश्चित करून हे मार्ग व वेळ तसेच वेळेनुसार बसची वाहतुक होण्याबाबत कंत्राटदारास कळविण्यात येईल.

क) बसचे थांबे कार्यालयीन संगणकांत दर्शविण्यात येईल

ड) सकाळचे सत्र व दुपारचे सत्रातील विद्यार्थ्यांना पत्तासह माहिती संगणकात दर्शविण्यात येईल.

इ) विद्यार्थ्यांनी / पालकांनी भरावयाची फीस, बँकेचे माहिती धनादेश क्र. इत्यादि बाबी संगणकात दर्शविण्यात येतील.

ई) अहवाल – शिक्षकांचा अहवाल, मार्गनिहाय अहवाल, थांब्याचा अहवाल, वर्गनिहाय अहवाल, थकीत फीचा अहवाल तयार करण्यात येईल.

### भाग – २

बस सेवेचा कंत्राटदार व बसचा मार्ग निश्चित झाल्यावर विद्यार्थ्यांना पुढील बाबी कळविण्यात येतील.

१) विद्यार्थ्याचे नाव, वर्ग, तुकडी निहाय व प्रत्येक विद्यार्थी निहाय बसचा मार्ग कंत्राटदाराचे नाव व देय फी दर्शविणारे विवरणपत्र

२) मुख्याध्यापक / प्राचार्य पालकांना, बससेवा सुरू करण्याचे पत्र

३) फी भरण्याची अनुसूची

४) भौतिक क्षेत्राप्रमाणे फी ची निर्धारणा व रचना दर्शविणारे विवरणपत्र

५) पालकांनी भरावयाचा बस सेवेसाठी अर्ज

६) शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांची संपुर्ण माहिती दर्शविणारे विवरणपत्र (पालकांना भरून शाळेला परत करावयाचे)

७) बसमध्ये विद्यार्थ्यांनी पालन करावयाची नियमावली

### भाग – ३

शाळा व कंत्राटदार यांच्यातील सामसयिक प्रमाणित करारपत्र हे रू. १०० एवढे मुद्रांक शुल्क असलेल्या गैरन्यायिक बंधपत्रावर करण्यात येईल यावर शाळेचे मुख्याध्यापक / प्राचार्य कंत्राटदार यांची स्वाक्षरी असेल या करारपत्राची एक प्रत कंत्राटदाराकडे व एक प्रत शाळेकडे असेल. सामायिक प्रमाणित करारपत्र हे पुरक पत्रासह दरवर्षी विहित करण्यात येईल.

BTO PUNE COPY RIGHT

## निवासी क्षेत्रासह वैयक्तिक माहिती दर्शविणारे विवरणपत्र

| |
|---|
| विद्यार्थ्याचे नाव |
| वडिलांचे नाव |
| आडनाव |
| वर्ग |
| तुकडी |
| घर क्रमांक |
| इमारत क्रमांक |
| इमारतीचे क्रमांक |
| रस्त्याचे नाव |
| क्षेत्र / पिनकोड |
| निवासी दूरध्वनी |
| पालकांचा कार्यालयीन दूरध्वनी |
| भ्रमण दूरध्वनी |

शाळेपासून ते विद्यार्थ्याचे निवासापर्यंत प्रमुख ठिकाणी व मार्ग पुढील उदाहरणाप्रमाणे दर्शविण्यात यावे.

| |
|---|
| अलमाऊट रस्ता, अंधेरी   जोगेश्वरी   हाजीअली   सायन ....................... |
| ........................................................................................................ |
| ........................................................................................................ |
| ....... इतर |

RTO PUNE COPY RIGHT

## परिशिष्ट – ब

### बससेवा सुरू करण्यासाठी मुख्याध्यापक / प्राचार्य यांचे परिपत्रक
### विषय शालेय बससेवा सन २०११-२०१२

प्रिय पालक,

शाळेच्या जवळ राहणारे विद्यार्थी व ज्याठिकाणी बससेवा पुरविणे शक्य नाही असे विद्यार्थी वगळता इतर ज्या विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षापासून बससेवा आवश्यक आहे अशा विद्यार्थ्यांनी दिनांक ................. पर्यंत शाळेच्या कार्यालयात अर्ज सादर करावेत. कोणत्याही विद्यार्थ्यास पुढे दर्शविल्याप्रमाणे शाळेच्या आवारात वैयक्तिक वाहनाने प्रवेश करता येणार नाही. (...............................................)

**उपलब्ध बसमार्ग व ओळख क्रमांक :**

**ओळखपत्र :** प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांना विशेष रंगाचे ओळखपत्र देण्यात येईल.

ओळखपत्रासाठी विद्यार्थ्यांचा अलिकडचा पासपोर्ट आकाराचा फोटो देण्यात यावा. ओळखपत्र दररोज सोबत ठेवण्यात यावे. विद्यार्थ्याने नमूद केल्यानुसार त्याच मार्गावर विद्यार्थ्यांना प्रवास करता येईल. पत्त्यामध्ये बदल झाल्यास तसे लेखी कळविणे आवश्यक आहे. ओळखपत्र हरवल्यास शाळेला कळविण्यात यावे व योग्य त्या शुल्कासह दुसरे ओळखपत्र पुरविण्यात येईल.

विद्यार्थ्यास स्विकारणाऱ्या व्यक्तीबाबत शाळेस कळविण्यात यावे. असे व्यक्ती हजर नसल्यास विद्यार्थ्यास शाळेत परत आणण्यास येईल.

बस सेवेबाबतच्या तक्रारी बसवाहक / परिचर यांना न सांगता शाळेच्या मुख्याध्यापक / प्राचार्य यांना कळविण्यात याव्या. याबाबत परिवहन अधिकाऱ्यांना मान्यता दिलेल्या बससेवा नियम व विनियम २०१० अंतर्गत कार्यवाही करण्यात येईल. कृपया बससेवा आवश्यक असल्यास पालकांच्या स्वाक्षरीसह अर्जात बसमार्ग विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक माहिती दर्शविणार विवरणपत्र (बसमध्ये आवश्यक असणारे) पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (मागे नाव व वर्ग लिहिलेले) इत्यादि तपशिलासह वर्गशिक्षकाकडे दिनांक ............. पर्यंत देण्यात यावा. अर्जासोबत फीचे धनादेश देण्यात येऊ नयेत.

दरवर्षी बससेवा देणाऱ्या कंत्राटदाराबरोबर (सामायिक प्रमाणित करारपत्र करण्यात येतात. असे करारपत्र बस सेवा प्रशासन कक्षात पडताळणीसाठी उपलब्ध आहेत. यासाठी यांचेकडे संपर्क साधावा.)

या सेवेसाठी आपले सहकार्य अपेक्षित आहे.

आपला,

नविन शैक्षणिक वर्ग पासून सुरू होईल. मुख्याध्यापक / प्राचार्य

RTO PUNE COPY RIGHT

## परिशिष्ट ड

## शालेय बस सेवेसाठी विद्यार्थ्यांचा / पालकांचा अर्ज

| | |
|---|---|
| प्रेक्षक | |
| श्री/श्रीमती | पत्ता |
| या विद्यार्थ्याचे पालक | निवासी दूरध्वनी क्र. |
| इयत्ता | कार्यालय दूरध्वनी क्र. |
| बसमार्ग | भ्रमणध्वनी क्र. |
| | दिनांक |

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,

महोदय,

माझ्या मुलासाठी / पाल्यासाठी शालेय बस सेवेकरिता मी अर्ज सादर करीत असून पुढील अटी / शर्ती व नियम मला मान्य असून या नियमांचे मी पालन करेन.

१) शालेय बस सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदारांबरोबर योग्य ते नियम / करार करण्यासाठी मी शाळेला प्राधिकृत करतो. या प्राधिकाराद्वारे शाळा सामायिक प्रमाणित करारनाम्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी योग्य ते निर्णय घेऊ शकते.

२) शाळा, उत्तम वाहक व दर्जेदार वाहने असलेल्या कंत्राटदाराची निवड करेल व याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात येईल.

३) शालेय बससेवा उपलब्ध करण्याच्या योजनेमध्ये शाळेची भूमिका ''सेवा पुरविण्याची'' असून या सेवेचा वापर करताना कोणतेही नुकसान अथवा दुखापतीची जबाबदारी शाळेची असणार नाही. शालेय बस सेवेतील निष्काळजीपणा अथवा कर्तव्यात कसूर करणे इत्यादी सर्व बाबींसाठी कंत्राटदार जबाबदार असेल. याबाबत पालक / विद्यार्थी शाळेविरूद्ध कोणतीही कार्यवाही करणार नाही.

४) नियमित व किफायतशीर दराने शालेय बस सेवा उपलब्ध करण्याच्या योजनेत शाळेची भूमिका ''सेवा पुरविणे'' एवढीच असून या सेवेबाबत निर्माण होणाऱ्या कोणत्याही कायदेशीर / आर्थिक दायित्वाबाबत शाळेची जबाबदारी नसून ही या सेवेची मूलभूत अट आहे व ही अट पालकांना मान्य व स्वीकृत असेल.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी (पालक)

RTO PUNE COPY RIGHT

## परिशिष्ट इ

## विद्यार्थ्याची माहिती दर्शविणारे विवरणपत्र (पालकांनी शाळेला द्यावयाचे)

| |
|---|
| मुलाचे / पाल्याचे नाव : |
| बस क्रमांक : |
| थांबा क्रमांक : |
| सकाळी : |
| मध्यान्ह : |
| इयत्ता : |
| बस परिचर आवश्यक आहे का : होय / नाही |

स्वाक्षरी

दिनांक (पालक)

---

### परिशिष्ट ई

### बसमध्ये विद्यार्थ्यांनी पालन करावयाचे नियम

१) बस चालू होण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी आपल्या जागेवर बसावे. बस चालू झाल्यावर उभे राहू नये.
२) मोठ्या मुलांनी मागे बसावे.
३) प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपले पास सोबत ठेवावे.
४) विद्यार्थ्यांनी आपल्या वस्तू स्वत: सांभाळाव्या.
५) शाळेच्या बॅग्ज बसच्या रॅकवर ठेवाव्या, बसण्याच्या जागेवर ठेवू नये.
६) बसमध्ये शांतता ठेवावी. गोंधळ करू नये. त्यामुळे चालकाचे लक्ष विचलत होऊ शकते.
७) योग्य थांब्यावर विद्यार्थी स्विकारण्यास कोणीही उपलब्ध नसल्यास अशा विद्यार्थ्यास शाळेत परत आणण्यात येईल व पालकांनी लेखी विनंती केल्यावर सोडण्यात येईल.
८) विद्यार्थ्यांनी शरीराचा कोणताही भाग खिडकी अथवा दरवाजातून बाहेर काढू नये.
९) विद्यार्थ्यांनी बसमध्ये स्वच्छता ठेवावी.
१०) विद्यार्थ्यांनी बसचे नुकसान केल्यास याबाबत मुख्याध्यापक / प्राचार्य यांना कळविण्यात येईल.
११) आवश्यक संख्येएवढेच विद्यार्थी बसमध्ये प्रवेश करतील.
१२) गैरवर्तणूक करणाऱ्या विद्यार्थ्यांची बससेवा रद्द करण्यात येईल.
१३) विद्यार्थ्यांनी विहित वेळेपूर्वी थांब्यावर यावे. विद्यार्थ्यासाठी बस थांबणार नाही.
१४) निश्चित करण्यात आलेला बस थांबा अथवा बस यामध्ये काही बदल झाल्यास विद्यार्थी / पालक यांनी हा बदल २४ तास अगोदर शाळेला कळवावा.
१५) बसमध्ये विसरलेली वस्तू शाळेमध्ये जमा करण्यात येईल.
१६) विद्यार्थ्यांनी शिस्तीत व त्वरीत बसमध्ये चढ-उतार करावे. बस थांबल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ शकतो.

वरील नियम विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी व सुरक्षित प्रवासासाठी करण्यात आले आहेत.

मुख्याध्यापक / प्राचार्य

RTO PUNE COPY RIGHT

**परिशिष्ट २**
**रू. १००/- एवढे मुद्रांक शुल्क असलेल्या बंधपत्रावर करावयाचे करारपत्र**
**करारनामा**

करारपत्राचा दिनांक .................. ठिकाण ...................... हा करारनामा (शाळेचे नाव) ....................................... पत्ता ................................................

आणि

(बससेवा देणाऱ्या संस्थेचे / कंत्राटदाराचे नाव) .......................................... (कार्यालयाचा पत्ता) ......................................................................................

शालेय बस सेवा देणारा कंत्राटदार यांच्यामध्ये करण्यात येत आहे.

या करारनाम्यात एकत्रित ''दोन्ही पक्षांना'' व वैयक्तिक ''पक्षाला'' असे संबोधले आहे.

**ज्याअर्थी :**

१) उपरोक्त नमूद कंत्राटदारांकडे आवश्यक बसेस, चालक व इतर कर्मचारी उपलब्ध आहेत व शालेय बससेवा पुरविण्यास कंत्राटदार इच्छुक आहे.

२) कंत्राटदारांकडे आवश्यक कायदेशीर अनुज्ञप्ती, मान्यता व इतर वैयक्तिक कागदपत्रे उपलब्ध आहेत.

३) शाळेतील सर्व वर्गातील विद्यार्थी बस सेवेचा उपयोग करण्यास इच्छुक आहेत.

४) प्रत्येक विद्यार्थ्याला कंत्राटदाराबरोबर वैयक्तिकरित्या करार करणे शक्य नसल्याने विद्यार्थ्यांच्या वतीने शाळा हा करारनामा करीत आहे.

**दोन्ही पक्ष पुढील बाबींना मान्यता देवून या बाबींचे पालन करण्यास मान्यता देतात.**

१) विद्यार्थी व पालक शाळेच्या वतीने उपरोक्त नमूद कंत्राटदारास शालेय बस सेवा देण्यास व या करारनाम्याच्या कलम १३ मध्ये नमूद सेवा पुरविण्यास करारबद्ध करीत आहे.

२) शालेय बससेवा आवश्यक असणारे सर्व विद्यार्थी व कंत्राटदार यांच्यामध्ये ''सेवा पुरविण्याची'' शाळेची भूमिका असेल. या करारनाम्यामुळे कंत्राटदार अथवा कंत्राटदाराचा अन्य कर्मचारी हा शाळेचा कर्मचारी होऊ शकत नाही.

३) सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने शाळेला हा करारनामा करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे. ही बाब कंत्राटदार मान्य करतो. शालेय बससेवा पुरविण्याच्या अटी या करारनाम्याद्वारे अस्तित्वात येतील. त्यामुळे शाळेची संपूर्ण मान्यता असल्याखेरीज कंत्राटदार या करारनाम्यात कोणतेही बदल करू शकणार नाहीत. तसेच या करारनाम्याद्वारे पुरविण्याच्या सेवेमध्ये कोणतेही बदल करू शकणार नाही. याबाबत कंत्राटदार शाळेला शाश्वती देतो. शाळा ही बससेवा पुरविण्याबाबत वेळोवेळी जे धोरण ठेवेल, दर आणि मार्गदर्शक सूचना देईल त्यांचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक असेल.

४) बससेवा सुरू करण्याचा दिनांक

बससेवा दिनांक ................ या दिनांकापासून सुरू करण्यास मान्यता देण्यात येते.

५) बससेवा सुरू करण्याच्या दिनांकाला विद्यार्थी संख्या :

बससेवा सुरू करण्याच्या दिनांकाला पुढीलप्रमाणे विद्यार्थी संख्या असेल. परिस्थितीनुसार वेळोवेळी विद्यार्थी संख्येचा आढावा घेण्यात येईल.



RTO PUNE COPY RIGHT

**विद्यार्थी संख्या विवरणपत्र**
**बस क्रमांक**
**विद्यार्थ्यांची संख्या**

सर्व चालक, पुरूष परिचर, महिला परिचर, कंत्राटदाराने दिलेले ओळखपत्रासह विहित गणवेश परिधान करतील.

६) ग्राह्यता व सुधारणा :

बससेवा सुरू झाल्यापासून एक वर्षापर्यंतच्या कालावधीसाठी हा करारनामा ग्राह्य व स्वीकृत असेल. हा करारनामा संपुष्टात येण्यापूर्वी ९० दिवस पूर्व योग्य त्या दर व अटींवर पुन्हा सुधारित करण्यात येईल.

७) बसेसची वेळ :

बसेसची वेळ शाळेच्या वेळेप्रमाणे निश्चित करण्यात यावी.

| विद्यार्थ्यांना शाळेत आणण्यासाठी बसची वेळ<br>इयत्ता | | |
|---|---|---|
| इयत्ता | बस क्रमांक | बस येण्याची वेळ |
| | | |
| | | |
| विद्यार्थ्यांना घरी सोडण्यासाठी बसची वेळ | | |
| वर्ग | बस क्रमांक | बस प्रस्थान वेळ |
| | | |
| | | |
| | | |

**८) कंत्राटदाराचे शुल्क :**

अ) कंत्राटदाराने दिलेल्या सेवेबद्दल ''जोडपत्रात'' विहित करण्यात आल्याप्रमाणे योग्य ते शुल्क अदा करण्यात येईल.

ब) प्रत्येक विद्यार्थी शाळेमार्फत कंत्राटदाराने दिलेल्या सेवेबद्दल शुल्क अदा करेल.

क) सर्व धनाकर्ष / धनादेश शाळेमार्फत गोळा करण्यात येऊन ते कंत्राटदारास दिले जातील.

ड) सेवेबाबतचे शुल्क कंत्राटदार स्विकारेल. मात्र विद्यार्थी / पालक व कंत्राटदार यामध्ये शाळेची समन्वयाची भूमिका असल्याने यासाठी शाळा जबाबदार असणार नाही.

इ) शालेय बस सेवेची फी प्राप्त झाल्यावर कंत्राटदार सर्व विद्यार्थ्यांना पावती देईल.

**९) कराराची समाप्ती :**

अ) करार समाप्त करण्यासाठी एक महिना पूर्वसूचना देऊन कोणत्याही कारणाशिवाय शाळा कराराची समाप्ती करू शकेल. एक महिन्याच्या कालावधीनंतर कंत्राटदार सेवा बंद करू शकेल. अथवा करार त्वरीत समाप्त करण्यासाठी एक महिना पूर्वसूचना कालावधीऐवजी शाळा कंत्राटदारास एक महिन्याचे शुल्क अदा करून करार समाप्त करू शकेल.

RTO PUNE COPY RIGHT

ब) कंत्राटदारास करार समाप्त करावयाचा असल्यास तीन महिने पूर्व लेखी सूचना शाळेला देईल.

क) करार समाप्तीनंतर शाळा कोणतेही शुल्क अदा करण्यास जबाबदार असणार नाही. कंत्राटदार अथवा कंत्राटदाराचे कर्मचारी यांचेकडून प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष चुकीने जरी काही नुकसान झाले असेल व या नुकसानीचा परिणाम शुल्क निश्चितीवर होणार असला तरीही याबाबत शाळेचे दायित्व असणार नाही.

ड) लेखी स्वरूपात असल्याखेरीज या करारात कोणतीही सुधारणा करता येणार नाही अथवा अशा सुधारणांची अंमलबजावणी करता येणार नाही.

**१०) प्रदाने :**

कंत्राटदाराचे कर्मचारी कोणत्याही कारणास्तव विद्यार्थी व पालक यांचेकडून कोणत्याही स्वरूपाचे उपदान, शुल्क अथवा पैशांची मागणी करणार नाहीत. तशा स्वरूपाच्या सूचना कंत्राटदार त्याच्या कर्मचाऱ्यांना देईल.

**११) बसेससाठी कंत्राटदाराचा विमा :**

अ) करारादरम्यान कंत्राटदार सेवेत असलेल्या बसेसचा, इतर तत्सम बाबींचा अधिकृत विमा उतरवेल.

ब) सेवा देणाऱ्या बसेसपासून इतर व्यक्तींना दुखापत व नुकसान झाल्यास अशा दाव्यांसाठी विमा उतरविण्यात येईल.

क) शालेय बससेवेतील विद्यार्थी जखमी झाल्यास, वा मृत्यू पावल्यास अशा दाव्यांसाठी कंत्राटदार विमा उतरवेल.

**१२) नियम पालनाचा अपवाद :**

दंगल, बंद, भूकंप, वादळ इतर तत्सम संकटकालिन परिस्थिती ही दोन्ही पक्षांना करारातील अटी नियमांचे पालन करण्यास अपवाद ठरवता येतील.

**१३) बससेवा :**

पुढील मर्यादांचे पालन करून कंत्राटदार शालेय बससेवा उपलब्ध करेल.

**अ) बसची स्थिती आणि मार्ग :**

१) सर्व बसेसची यांत्रिक व इतर स्थिती उत्तम असेल. ''शालेय बस नियम व विनियम २०१०'' अंतर्गत विहीत प्राधिकरणाने बसेसची स्थिती प्रमाणित केलेली असेल.

२) सर्व बसेसना विद्यार्थी प्रवासासाठी परवाना असेल या बसेस पिवळ्या रंगाच्या असतील तसेच बसच्या समोर व मागे ''शालेय बस'' लिहिले जाईल.

३) शाळेच्या कराराव्यतिरिक्त इतर करार असलेल्या बसेसना संपूर्ण पिवळा रंग न देता बसेसवर मध्यभागी सर्व बाजूने २० इंच रूंदीची पिवळ्या रंगाची पट्टी असेल.

४) शालेय बस सेवेसाठीच्या बसेस नोंदणीपासून १५ वर्षापेक्षा अधिक कालावधीच्या नसतील. मुंबईतील बसेस नोंदणीपासून ८ वर्षापेक्षा अधिक कालावधीच्या नसतील. ज्या बसेस सिएनजी वर चालतात व १५ वर्षापेक्षा अधिक कालावधीच्या नाहीत अशा बससेवा विद्यार्थी वाहतुकीचा परवाना देण्यात येईल.

५) प्रत्येक बसमध्ये विद्यार्थ्यांचे नाव, वर्ग, रक्तगट, विद्यार्थ्यांचे बसमध्ये चढण्याचे व उतरण्याचे ठिकाण दर्शविणारे विवरणपत्र उपलब्ध असेल. या विवरणपत्रामध्ये शाळेने दिलेला बसचा सुरूवात व शेवटपर्यंतचा मार्गही दर्शविण्यात येईल. बसचे मार्ग व थांबे शाळेकडून निश्चित करण्यात येतील.

६) मुंबई महानगरपालिका क्षेत्रात बसची कमाल वेगमर्यादा ताशी ४० कि.मी. एवढी असेल तर इतर महानगरपालिका क्षेत्रात ताशी ५० किमी. एवढी असेल.

७) प्रत्येक बसमध्ये स्पष्टपणे दिसतील असे शाळेचे नाव, मार्ग क्रमांक लिहिलेले दोन फलक बसविण्यात येतील. यापैकी

RTO PUNE COPY RIGHT

एक फलक ८ इंच रूंदीचा व २ १/२ फुट लांबीचा असेल. हा फलक बसच्या समोरच्या बाजूच्या डावीकडे बसविण्यात येईल. तर दुसरा फलक ८ इंच × ८ इंच एवढ्या आकाराचा बसच्या प्रवेशद्वाराजवळील डाव्या बाजूच्या खिडकीजवळ बसविण्यात येईल.

८) प्रत्येक फलक ३२५ एमएम पेक्षा अधिक नाही एवढ्या उंचावर बसविण्यात येईल. फलक खाली पडणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

९) बसच्या प्रवेश व निर्गम मार्गावरच पायऱ्यांवर हाताने धरावयाचे कठडे बसवण्यात येतील.

१०) बसला मोठ्या आवाजातील अथवा हवेच्या दाबावरील हॉर्न बसवण्यात येणार नाहीत.

११) बसमधून विहीत क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी प्रवास करू शकणार नाही.

१२) प्रत्येक बसमध्ये सुरक्षा दांडे, हाताने धरावयाचे कठडे, संकटकाळी बाहेर पडण्याचा मार्ग, प्रथमोपचार संच, अग्निशमन यंत्र उपलब्ध असेल.

**बसमध्ये पुढील बाबीही उपलब्ध असाव्यात :**

प्रथमोपचार संचामध्ये आवश्यक सर्व प्रथमोपचार साहित्य व औषधी उपलब्ध असतील. भारतीय प्रमाण संस्थेने प्रमाणित केलेले, ५ किलोग्रॅम क्षमतेचे एबीसी प्रकारातले दोन अग्नीशमन यंत्र बसमध्ये असतील त्यापैकी एक चालक कक्षामध्ये तर दुसरे संकटकाळी बाहेर पडावयाच्या मार्गाजवळ बसविण्यात येईल.

१३) बसच्या खिडक्यांना तीन आडव्या दांड्या असाव्यात. दोन दांड्यांमधील अंतर ५ से.मी. पेक्षा अधिक असू नये.

१४) मुलांच्या बॅग्ज, पाणी बॉटल्स, जेवणाचे डबे ठेवण्यासाठी बसमध्ये स्वतंत्र व्यवस्था असेल.

१५) बसची सर्व आसने समोरील बाजूची असावीत.

१६) शालेय बसवर कोणतीही व्यावसायिक जाहिरात लावण्यात येणार नाही.

१७) बसेसच्या सर्व प्रमाणित कागदपत्रांच्या प्रती शाळेमध्ये जमा करण्यात येतील.

**ब) बसमधील कर्मचारी वर्ग :**

१. शालेय बसमध्ये प्रशिक्षित चालक, एक पुरूष परिचर व एक महिला परिचर असेल. हे कर्मचारी विद्यार्थी बसमध्ये चढउतार करताना त्यांच्या सुरक्षिततेकडे लक्ष देतील.

२. बसमधील सर्व कर्मचारी कंत्राटदाराने दिलेले ओळखपत्रासह स्वच्छ गणवेश परिधान करतील.

३. सर्व कर्मचाऱ्यांना मराठी / हिंदी / इंग्रजी भाषेचे ज्ञान असेल.

४. सर्व कर्मचारी प्रशिक्षित असतील व प्रवासादरम्यान विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेविषयी दक्ष असतील.

५. कंत्राटदाराने नेमलेल्या चालकांना ५ वर्षे एवढा वाहन चालविण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. वाहतुकीच्या कोणत्याही गुन्ह्यासाठी त्यास दंड झालेला नसावा. वाहतुकीचा परवाना अनुज्ञाप्ती, बिल्ला इत्यादी सर्व कागदपत्रे त्याच्याजवळ असणे आवश्यक आहे.

६. सर्व कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती वाहकाने शाळेत जमा करणे आवश्यक आहे.

७. बसमध्ये धुम्रपान करण्यास मनाई आहे.

८. सर्व कर्मचारी विद्यार्थ्यांना बसमध्ये चढ–उतार करताना मदत करतील.

९. बस चालू झाल्यावर बसचे दरवाजे बंद असतील.

RTO PUNE COPY RIGHT

१०. बसमध्ये संगीत गाणे लावण्यास मनाई आहे.

११. बसचे कर्मचारी विद्यार्थ्यांना कोणतेही खाद्यपदार्थ अथवा पेय देणार नाहीत.

१२. विद्यार्थ्याला स्विकारण्यास अधिकृत व्यक्ती बस थांब्यावर हजर नसल्यास अशा विद्यार्थ्यास शाळेत परत आणण्यात येईल व पालकांना शाळेत बोलावून विद्यार्थी त्यांच्याकडे सोपविण्यात येईल.

**क) विशेष अटी :**

१. अर्धा दिवस शाळा, परिक्षा इत्यादी कालावधीत कंत्राटदार शाळेने निर्देष दिल्याप्रमाणे बससेवा देतील.

२. बंद, वाहतूक कोंडी, अपघात, बसचा तांत्रिक बिघाड इत्यादी सर्व परिस्थितीबाबत कंत्राटदाराकडून त्वरीत शाळेला कळविण्यात येईल. बसमधील कर्मचारी घटनेबाबत शाळेला कळवतील व विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती व्यवस्था करतील.

३. बसची असुरक्षित स्थिती, अनियमितता, बस वेळेवर न येणे, कर्मचारी गैरहजर असणे इ. बाबींसाठी रू. १०००/– प्रतिमाह दंड आकारण्यात येईल.

४. प्रवासादरम्यान बस बंद पडल्यास रू. ५०/– प्रतिथांबा / प्रतीफेरी दंड आकारण्यात येईल त्यामुळे पालकांना करावा लागलेला खर्च कंत्राटदाराच्या खात्यातून करण्यात येईल.

५. विद्यार्थ्यांना घेण्यासाठी विलंब, शाळेत सोडण्यासाठी विलंब, तसेच निश्चित थांब्याऐवजी इतर थांब्यावर सोडणे इ. बाबींसाठी रू. १०००/– दंड आकारण्यात येईल.

६. कराराची खात्रीने अंमलबजावणी व्हावी यासाठी कंत्राटदार रू. २०००/– एवढी रक्कम शाळा / व्यवस्थापनाकडे जमा ठेवेल. या रकमेवर व्याज मिळणार नाही. कराराची समाधानकारक समाप्ती झाल्यावर व काही दंड आकारण्याची रक्कम असल्यास ती वजा करून सदर रक्कम कंत्राटदारास परत करण्यात येईल.

७. बससेवा सुरळीतपणे चालावी यासाठी आवश्यक असणाऱ्या प्रशासकीय खर्चासाठी कंत्राटदार शाळेला प्रतिविद्यार्थी कमला रू. २५/– व किमान रूपये ................../–एवढी रक्कम एकरकमी अदा करेल. चालू वर्षातील खर्च होऊन रक्कम शिल्लक राहिल्यास पुढील वर्षातील खर्चासाठी रक्कम वापरण्यात येईल.

८. दंड म्हणून आकारण्यात आलेल्या रकमा, कंत्राटदाराच्या खात्यावर खर्ची दर्शविण्यात येतील तसेच कराराच्या यशस्वी अंमलबजावणी प्रती ठेव म्हणून जमा रकमेतून वजा करण्यात येतील. याबाबत कोणतेही कारण दिले जाणार नाही. याबाबत शाळेला संपूर्ण अधिकार असतील.

९. वर्षाच्या शेवटी कंत्राटदारास वजावटीचे विवरणपत्र देण्यात येईल. ठेव रक्कमेपेक्षा दंडाच्या रकमा अधिक असल्यास कंत्राटदार त्वरीत अधिक रकमांचे प्रदान करेल.

**ड) शिस्त व सुरक्षितता :**

अ) शाळेच्या विद्यार्थ्यांव्यतिरिक्त इतर शाळेच्या विद्यार्थ्यांना अथवा पालकांना बसमध्ये प्रवेश देण्यात येणार नाही.

ब) विद्यार्थ्यांनी बसमध्ये शिस्त पाळावी याबाबत कर्मचारी दक्षता घेतील.

क) कोणत्याही घटनेची माहिती कर्मचारी शाळेला कळवतील.

ड) बसमध्ये विद्यार्थ्यांचे हजेरीपट ठेवण्यात येईल.

**इ) संकटकाळात करावयाची कार्यवाही : (उदा. बसचा तांत्रिक बिघाड, वाहतुक कोंडी, संप इत्यादी)**

१) वरील उदाहरणात नमुद केल्याप्रमाणे अपवादात्मक परिस्थिती उद्भवल्यास कंत्राटदार शाळेस कळवेल व विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे शाळेत अथवा निवासस्थानी सुरक्षितपणे नेण्याची व्यवस्था करेल.

२) बसमध्ये तांत्रिक बिघाड निर्माण होऊन बस बंद झाल्यास कंत्राटदार शाळेला माहिती देईल. याबाबत कंत्राटदारास दंड आकारण्यात येईल.

३) प्रवासादरम्यान बस बंद पडल्यास परिचर याबाबत शाळेला माहिती देईल, विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवेल, कोणत्याही परिस्थितीत परिचर विद्यार्थ्यांना सोडून इतरत्र जाणार नाही. कंत्राटदार दुसऱ्या बसची व्यवस्था करेल तोपर्यंत विद्यार्थी बंद असलेल्या बसमध्ये बसतील.

४) बंद, संप यामुळे बस उपलब्ध होणार नसतील तर याबाबत शाळेला दोन दिवस पूर्व कळविण्यात येईल.

**ई) इतर सेवा :**

अ) भ्रमण दूरध्वनी यंत्र अथवा बिनतारी संदेश यंत्र बसमध्ये उपलब्ध असेल.

ब) बसमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यास अथवा संकटकाळात, कंत्राटदार दुसरी बससेवा त्वरीत उपलब्ध करेल.

क) शाळेने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सर्व थांबे व बसमार्ग दर्शविणारा नकाशा कंत्राटदार चालकास देईल.

उ) या कराराची यशस्वी अंमलबजावणी व्हावी या दृष्टीने कंत्राटदार त्याच्याकडील कर्मचाऱ्यांना वेतन / मजुरी अदा करेल तसेच या बाबतचे सर्व लेखे, नोंदी व कागदपत्रे जतन करेल. कराराचे पालन व्हावे या दृष्टीने कंत्राटदार नियम करेल व नियमांचे पालन व्हावे या दृष्टीने दक्षता घेईल. बससेवा सुरळीतपणे चालू रहावी या दृष्टीने कर्मचाऱ्यांची बदली करू शकेल, तसेच नियमानुसार कर्मचाऱ्यांवर कारवाई करू शकेल.

ऊ) आवश्यक असल्यास कामगार करार कायदा १९७० अंतर्गत आवश्यक ते परवाने व अनुज्ञाप्ती घेण्यात येईल.

ओ) कंत्राटदार सेवेचे श्रेय मिळविण्यासाठी कोणत्याही प्रकारे शाळेच्या नावाचा उपयोग करणार नाही याबाबत कंत्राटदार अथवा कर्मचारी यांच्या कोणत्याही दायित्वाची, कर्जाची अथवा कोणत्याही बंधनाची जबाबदारी शाळेवर असणार नाही.

औ) कंत्राटदार अथवा कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे शाळेच्या साहित्याचे अथवा इतर कोणतेही नुकसान झाल्यास याची सर्व जबाबदारी त्यांच्यावर असेल.

अं) कर्मचाऱ्यांना शाळेशी संपर्क साधण्यासाठी त्यांच्याकडे संपर्काचे योग्य साधन असणे आवश्यक आहे. असे साधन पुरविण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

**१४) अभिहस्तांकन :**

दोन्ही पक्ष लेखी मान्यता असल्याखेरीज या करारान्वये प्राप्त अधिकार, व्यवहार अथवा बंधने तिसऱ्या पक्षावर सोपवणार नाही. कराराचे पालन होण्याच्या दृष्टीने व दोन्ही पक्षांची लेखी मान्यता असल्यास या करारान्वये प्राप्त अधिकार, व्यवहार जबाबदारी व बंधने तिसऱ्या पक्षाकडे सोपवता येतील. मात्र या करारातील सर्व बाबी अस्तित्वात राहतील.

**१५) कराराच्या दोन प्रती असतील. दोन्ही प्रती मुळ प्रती समजण्यात येतील. एक प्रत शाळेकडे व एक प्रत कंत्राटदाराकडे असेल.**

**१६) इतर :**

अ) या करारासंबधी सर्व पत्रव्यवहार, सूचना व इतर बाबी या इंग्रजीतून करण्यात येतील. कोणताही पक्ष अन्य भाषेत भाषांतर करणार नाही.

ब) अंमलबजावणी :

या करारातील काही अटी, शर्ती व तरतुदी अनाधिकृत, बेकायदेशीर, पालन न करण्यायोग्य ठरल्या तर इतर अटी,

RTO PUNE COPY RIGHT

शर्ती व तरतुदींवर याचा परिणाम होणार नाही. इतर अटी, शर्ती व तरतुदी अस्तित्वात राहून हा करार कायदेशीररित्या अस्तित्वात राहील.

**१७) गोपनियता :**

शाळेचे तक्रार केलेल्या विद्यार्थ्यांची यादी व या बाबतचे इतर कागदपत्रे ही शाळेची मालमत्ता असून याबाबत कंत्राटदारास असलेली माहिती गोपनीय ठेवणे आवश्यक असेल. असे सर्व कागदपत्र कंत्राटदार करार समाप्तीनंतर शाळेस परत करेल. या माहितीचा अथवा शाळेच्या नावाचा उपयोग कंत्राटदार शाळेची मान्यता असल्याखेरीज इतर कोठेही अथवा कोणत्याही व्यवहारात करणार नाही.

**१८) अधिकारिता :**

या करारातील दोन्ही पक्षांमध्ये करारासंबंधी वाद उद्‌भवल्यास अशा वादावरील निर्णयासाठी मुंबई न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रांतर्गत कार्यवाही करण्यात येईल.

**१९) लेखा व नोंदी :**

या सेवेबाबत आवश्यक अशा सर्व नोंदी व लेखे कंत्राटदाराकडून जतन करण्यात येतील अशा नोंदीचे व लेख्यांचे निरीक्षण शाळा करू शकेल.

शाळा व कंत्राटदार यांनी ................................. या दिनांकास सदर करार केलेला आहे.

साक्षीदार

करीता करीता




RTO PUNE COPY RIGHT

## परिशिष्ट २-१

### करारनाम्यासोबतचे जोडपत्र

**(हे जोडपत्र या कराराचा एक भाग असून आवश्यकतेप्रमाणे यामध्ये योग्य ते बदल करता येतील.)**

अ) कंत्राटदार वाहक / परिचर यांनी केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करेल.

ब) शालेय बस फिच्या रचनेमध्ये व अटींमध्ये वेळोवेळी आवश्यक ते बदल करता येतील व नवीन अटींचा समावेश करता येईल.

**शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीपासून फीची रचना करण्यात येईल व फीस १२ महिन्यांसाठी देय असेल.**

**क्षेत्रनिहाय शालेय बस फी (दरवर्षी निश्चित करण्यात येणारी)**

१) १२ महिन्यांसाठी फीस दि. ..................... पासून ते दि. ................... पर्यंत (दोन हप्त्यात देय असेल तर कालावधी व दिनांक नमूद करावा.)

२) वास्तव्याचे क्षेत्र नंतर निश्चित होणार असेल तर फीस एकूण विद्यार्थी संख्या, मार्ग, क्षेत्र यावर अवलंबून असेल.

३) फीस धनाकर्षाद्वारे देय असेल. १२ महिन्यासाठी फीस एकरकमी एका धनाकर्षाद्वारे व एका हप्त्यांत किंवा दोन हप्त्यात देय असेल.

४) बस फी बाबत खालील बाबी विहीत करण्यात येतात.

अ) विद्यार्थ्याला शाळेने परवानगी दिल्यास तो पूर्वीच्या मार्गाऐवजी दुसऱ्या मार्गाचा उपयोग करू शकेल. कंत्राटदारानेही त्यास मान्यता देणे आवश्यक आहे.

ब) शाळेने मान्यता दिल्यास विद्यार्थी सकाळच्या सत्रात व दुपारच्या सत्रात वेगवेगळ्या मार्गांचा उपयोग करू शकतात. फीस मात्र एकरकमी सकाळच्या सत्रातील कंत्राटदारास देय असेल.

RTO PUNE COPYRIGHT



# वेगमर्यादा नियंत्रक (स्पीड गव्हर्नर)

**महाराष्ट्र शासन राजपत्र**

असाधारण भाग चार – अ

(वर्ष ३, अंक ८७) मंगळवार, मार्च १३, २०१२ / फाल्गुन २३, शके १९३३ (पृष्ठे ४)

किंमत : रूपये १४.००

**असाधारण क्रमांक ३१**

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक – अ आणि एक – ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**गृह विभाग**

**मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक १३ मार्च २०१२**

**अधिसूचना**

केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९.

१. क्रमांक एमव्हीआर ११०९ / प्र.क्र. ४२४ / परिवहन २ – केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ११८ च्या उपनियम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासन, याद्वारे पुढील मोटार वाहने अधिसूचित करीत आहे. ज्यामध्ये, वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे मानक एआयएस : ०१८ शी अनुरूप असणारा वेग मर्यादा नियंत्रक (स्पीड गव्हर्नर) (वेग मर्यादा नियंत्रक साधन) अशा परिवहन वाहनाच्या चालकाकडून (ऑपरेटरकडून) बसविण्यात येईल आणि ते अशा रितीने बसविण्यात येईल की, राज्य परिवहन प्राधिकरण किंवा प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांच्या अधिकृत मोहोरेसह मोहोरबंद करता येईल, जेणेकरून अशी मोहोर (सील) तोडल्याशिवाय ते काढून टाकता येणार नाही किंवा त्यात अनधिकृत फिरवाफिरव करता येणार नाही.

२. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार–अ, मार्च १३, २०१२ / फाल्गुन २३, शके १९३३

| अ.क्र. (१) | वाहनाचा प्रवर्ग (२) | वेगमर्यादा नियंत्रक (स्पीड गव्हर्नर) बसविण्यासाठी दिनांक (३) |
|---|---|---|
| १. | शालेय बसची नवीन नोंदणी | १ मे २०१२ पासून नोंदणीच्या वेळी |
| २. | ३० एप्रिल २०१२ पूर्वी नोंदणी केलेल्या शालेय बस | १ मे २०१२ नंतर आणि १ सप्टेंबर २०१२ पूर्वी करावयाच्या योग्यता प्रमाणपत्राच्या (फिटनेस) नूतनीकरणाच्या वेळी |
| ३. | नव्याने नोंदणी होणारी टँकर्स व डंपर्स | १ जुलै २०१२ पासून नोंदणीच्या वेळी |
| ४. | ३० जून २०१२ पूर्वी नोंदणी केलेले टँकर्स व डंपर्स | १ जुलै २०१२ नंतर आणि १ जुलै २०१३ पूर्वी यापैकी जो आधीचा असेल, त्या दिनांकास करावयाच्या योग्यता प्रमाणपत्राच्या (फिटनेस) नूतनीकरणाच्या वेळी |
| ५. | नव्याने नोंदणी होणारी करारावरील वाहने आणि खाजगी सेवा वाहने (ऑटोरिक्षा, मीटर कॅब व दूचाकी, टॅक्सी वगळून) | १ सप्टेंबर २०१२ पासून नोंदणीच्या वेळी |
| ६. | ३१ ऑगस्ट २०१२ पूर्वी नोंदणी केलेली करारावरील वाहने (ऑटोरिक्षा, मीटर कॅब व दुचाकी टॅक्सी वगळून), आणि खाजगी सेवा वाहने. | १ सप्टेंबर २०१२ नंतर किंवा १ सप्टेंबर २०१३ पूर्वी यापैकी जो आधीचा असेल त्या दिनांकास करावयाच्या योग्यता प्रमाणपत्राच्या (फिटनेस) नूतनीकरणाच्या वेळी |
| ७. | राष्ट्रीय परवान्यावर नव्याने नोंदणी होणारी माल वाहतूक वाहने | १ नोव्हेंबर २०१२ पासून नोंदणीच्या वेळी |
| ८. | ३१ ऑक्टोबर २०१२ पूर्वी नोंदणी केलेली राष्ट्रीय परवान्यावरील माल वाहतूक वाहने | १ डिसेंबर २०१२ नंतर किंवा १ नोव्हेंबर २०१३ पूर्वी यापैकी जो आधीचा असेल त्या दिनांकास करावयाच्या योग्यता प्रमाणपत्राच्या (फिटनेस), नूतनीकरणाच्या वेळी |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

भि.रा. वाढवे,
शासनाचे सहसचिव

क्र. एमव्हीई–०३०१/सीआर–६४६४(अ)/का.२(४)/जा.क्र.५०८१
परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, ३/४ मजला, डॉ. आंबेडकर
उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व),
मुंबई – ४०००५१.
दिनांक : १३/०४/२०१२

प्रति,
सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी,
सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
महाराष्ट्र राज्य.

विषय :– परिवहन संवर्गातील काही प्रकारच्या वाहनांना वेग नियंत्रक बसविण्याबाबत...

संदर्भ :– शासन अधिसूचना क्र. एमव्हीआर–१११०९/प्र.क्र. ४२४/परि–२, दि. १३/३/२०१२

१. केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ११८ नुसार, परिवहन संवर्गातील वाहनांना अखड–०१८ या मानकांचे वेग नियंत्रक बसविण्याची तरतूद विहित केलेली आहे. केंद्रशासन अधिसूचना क्र. जी.एस. आर (ई) दिनांक ३१/५/२००२ अन्वये केंद्रीय मोटार वाहन नियम ११८ मध्ये सुधारणा करण्यात येऊन परिवहन संवर्गातील वाहनांना वेग नियंत्रक बसविण्याचे केंद्र शासनाला असलेले अधिकार राज्य शासनास देण्यात आले आहेत.

२. दि. २१/८/२००९ रोजी सह सचिव (MORTH) केंद्र शासन यांनी सर्व राज्यांच्या परिवहन सचिवांना लिहिलेल्या अर्धशासकीय पत्रात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. २०/११/१९९७ च्या निकालाचा उल्लेख करून सर्व व्यवसायिक वाहनांना स्पीड गव्हर्नर सक्तीचे करण्यासाठी राज्य शासनांनी त्वरीत कार्यवाही करण्याचे निर्देश जारी केले होते. त्यानुसार परिवहन आयुक्त कार्यालयाने शासनास पाठविलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने दिनांक ५/५/२०१० रोजी वेग नियंत्रक बसविण्याबाबत प्रारूप अधिसूचना प्रसिद्ध केली होती व जनतेकडून प्राप्त सूचना / हरकती विचारात घेऊन, अधिसूचना क्र. एमव्हीआर–१११०९/प्र.क्र.४२४/ परि–२, दि. १३/३/२०१२ अन्वये परिवहन संवर्गातील काही प्रकारच्या वाहनांना अखड–०१८ या मानकांचे वेग नियंत्रक बसविण्याबाबत अधिसूचना जारी केली आहे. (प्रत संलग्न) सदर अधिसूचनेनुसार, खालीलप्रमाणे परिवहन संवर्गातील वाहनांना वेग नियंत्रक बसविण्याबाबतचा प्रारंभ दिनांक व कालमर्यादा निश्चित केली आहे.

| क्र. | वाहनाचा प्रवर्ग | वेगमर्यादा नियंत्रक (स्पीड गव्हर्नर) बसविण्यासाठी दिनांक |
|---|---|---|
| १. | नवीन नोंदणी होणाऱ्या शालेय बसेस | १ मे २०१२ पासून नोंदणीच्या वेळी |
| २. | ३० एप्रिल २०१२ पूर्वी नोंदणी केलेल्या शालेय बसेस | १ मे २०१२ पासून योग्यता प्रमाणपत्राच्या (फिटनेस) नूतनीकरणाच्या वेळी, मात्र दि. १/९/२०१२ पूर्वी |
| ३. | नव्याने नोंदणी होणारे टँकर व डंपर्स | १ जुलै २०१२ पासून, नोंदणीच्या वेळी |
| ४. | ३० जून २०१२ पूर्वी नोंदणी केलेले टँकर्स व डंपर्स | १ जुलै २०१२ पासून योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणाच्या वेळी व दिनांक १/७/२०१३ पूर्वी यापैकी अगोदरचे दिनांकास |
| ५. | नव्याने नोंदणी होणारी कंत्राटी वाहतूकीची वाहने आणि खाजगी सेवा वाहने (ऑटोरिक्षा, मीटर कॅब, दुचाकी टॅक्सी वगळून) | १ सप्टेंबर, २०१२ पासून, नोंदणीच्या वेळी |

| क्र. | वाहनाचा प्रवर्ग | वेगमर्यादा नियंत्रक (स्पीड गव्हर्नर) बसविण्यासाठी दिनांक |
|---|---|---|
| ६. | ३१ ऑगस्ट २०१२ पूर्वी नोंदणी होणारी कंत्राटी वाहतूकीची वाहने (ऑटोरिक्षा, मीटर कॅब दुचाकी टॅक्सी वगळून) आणि खाजगी सेवा वाहने | १ सप्टेंबर २०१२ पासून योग्यता प्रमाणपत्राच्या (फिटनेस) नूतनीकरणाच्या वेळी व दिनांक १/९/२०१३ पूर्वी यापैकी अगोदरचे दिनांकास |
| ७. | राष्ट्रीय परवान्यावर नव्याने नोंदणी होणारी मालवाहतूक वाहने | १ नोव्हेंबर २०१२ पासून नोंदणीच्या वेळी |
| ८. | ३१ ऑक्टोबर २०१२ पूर्वी नोंदणी केलेली राष्ट्रीय परवान्यावरील मालवाहतूक वाहने | १ नोव्हेंबर २०१२ पासून योग्यता प्रमाणपत्राच्या (फिटनेस) नूतनीकरणाच्या वेळी व दिनांक १/११/२०१३ पूर्वी यापैकी अगोदरचे दिनांकास |

३. केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम १२६ अन्वये ऑटोमोटीव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया, पुणे या तपासणी संस्थेने खालील वेग नियंत्रक उत्पादकांना मान्यता दिलेली आहे.

| क्र. | उत्पादकाचे नाव | पत्ता |
|---|---|---|
| 1. | M/s. Aasma Techno Products Pvt. Ltd., | 32/1510, First floor, Kalavath Cross Road, Palarivattom, Kochi - 680025. |
| 2. | M/s. Convertz Technologies (I) Pvt. Ltd., | Door No. 8-2-684/3/9, Road No. 12, Banjara Hills, Bhavani Enclave, Hydrabad - 500 034. |
| 3. | M/s. Dewan Autotech Services | A-1/1503, New Azadpur Subzi Mandi, Delhi - 110033. |
| 4. | M/s. Digila Devices India (P) Ltd., | NH-212, Industrial Layout, Near Govt., Technical School, Sulthan Bathery, North Kerala - 673592. |
| 5. | M/s. Eastern Steel Industries | ESI, 10-B, Deonar Road, Deonar Mumbai - 400088. |
| 6. | M/s. Pricol Ltd., | Plant - I, Post Box - 4209, Perianaickenpalayam Coimbatore - 641020. |
| 7. | M/s. Striders CNG Engineers Pvt. Ltd. | CW-42, Sanjay Gandhi Transport Nagar, G.T. Karmal Road, Delhi - 110042. |
| 8. | M/s. Craysol Technologies India Pvt. Ltd. | 31/449 L, Rizwwan Estate Pathadipalam Edapally Kochi-682024. |

४. उपरोक्त उत्पादकांना त्यांनी उत्पादित केलेल्या वेग नियंत्रकांबाबत तपासणी संस्थेमार्फत प्रोटोटाईप मान्यता देताना जारी करण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रामध्ये वैधता नमूद केलेली असते. सबब, वैधता संपलेल्या उत्पादकांचे वेग नियंत्रक वाहनावर बसविण्यासाठी स्विकारण्यात येऊ नयेत.

५. मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ११२ मधील तरतूदीनुसार, केंद्र शासनाने अधिसूचना क्र. ४२५ (ई), दि. ९/६/१९८९ नुसार वाहन संवर्गनिहाय वेग मर्यादा निश्चित केलेली आहे. तसेच शासन अधिसूचना दि. २२/३/२०११ नुसार, महाराष्ट्र मोटार (स्कूल बस करीता विनियम), नियम २०११ मधील नियम १० (अठरा) नुसार, स्कूल बसेसकरिता महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये वाहनाचा वेग ४० किलोमीटर प्रती तास आणि महानगपालिका हद्दीव्यतिरिक्त हद्दीमध्ये ५० किलोमीटर प्रती तासापेक्षा अधिक असणार नाही अशी तरतूद केलेली आहे. त्यामुळे संवर्गनिहाय परिवाहनांवर वेग नियंत्रक बसविताना, वरील बाबींची पूर्तता केल्याबाबतची खात्री करणे आवश्यक राहील.

RTO PUNE COPYRIGHT

६. वाहनावर वेग नियंत्रक बसविताना ते सील करावयाच्या सर्व जागी, नवीन पद्धतीचे सील (Polycarbonate Patented Tool Less Roto Seal) वापरण्यात यावे.

७. परिवहन संवर्गातील वाहनांना वेग नियंत्रक बसविण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबविण्यात यावी.

**१) वितरक / उत्पादकाची जबाबदारी –**

क) मान्यताप्राप्त उत्पादक / वितरक वाहनावर वेग नियंत्रक बसविताना, सदर वेग नियंत्रक विहीत वेग मर्यादेला नियंत्रित / निश्चित करतील व सदर वाहन विहीत वेग मर्यादेचे पालन करीत असल्याची खातरजमा केल्यानंतर, Installation Certificate वितरीत करतील.

ख) केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ चे नियम ११८ (१) मधील तरतूदीनुसार, परिवहन संवर्गातील वाहनांना बसविलेला वेग नियंत्रक, प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या अधिकृत सिलद्वारे सिलबंद करणे अनिवार्य आहे. त्यामुळे वितरक / उत्पादकाने त्याकरिता लागणारे सील (Polycarbonate Patented Tool Less Roto Seal) पुरविणे आवश्यक असेल.

ग) वेग नियंत्रक विकताना उत्पादक / वितरकाने जारी करण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रास सलग अनुक्रमांक असेल आणि प्रमाणपत्रामध्ये वेग नियंत्रक उपकरणाचा क्रमांक, कमाल वेग, प्रमाणपत्र जारी करण्याचा दिनांक, विधीग्राह्यता, इनव्हॉईस क्रमांक, तपासणी संस्थेने प्रमाणित केलेल्या वेग नियंत्रकाच्या वैधता प्रमाणपत्राची मुदत, तसेच नोंदणी क्रमांक, चॅसीस क्रमांक, इत्यादीबाबत वाहनाचा पूर्ण तपशील इत्यादींचा न चुकता उलेख केलेला असेल.

**२) वाहन मालकाची जबाबदारी –**

उपरोक्त प्रवर्गातील नवीन परिवहन वाहन नोंदणीच्या वेळेस व योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणाच्या तपासणीसाठी वाहन सादर करण्याच्या पुरेसे (१० दिवस) अगोदर, वाहन मालकाकडून बाब क्र. १ मध्ये नमूद केलेल्या बाबींची पूर्तता करणे अपेक्षित आहे.

**३) कार्यकारी अधिकारी यांची जबाबदारी –**

क) वाहनावर वेग नियंत्रकाचे जे मॉडेल बसविण्यात आलेले आहे, त्याला तपासणी संस्थांची मान्यता असल्याची व सदर मान्यता वैध असल्याची मोटार वाहन निरीक्षक / सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक खात्री करतील.

ख) वाहनावर वेग नियंत्रक लावताना, एआरएआय ने विहीत केलेल्या एकूण ५ ठिकाणी सील करणे आवश्यक आहे. वितरकांनी त्यानुसार सील बसविली आहेत का याची तपासणी अधिकाऱ्यांनी खात्री करावी.

ग) मोटार वाहन निरीक्षक वाहनाच्या सर्व कागदपत्रांची छाननी करतील.

घ) वाहन विहीत वेग मर्यादेचे पालन करीत आहे याची प्रत्यक्षात खातरजमा करतील. यासाठी कार्यकारी अधिकारी वाहन चालकाशेजारी बसून वाहन प्रत्यक्ष रस्त्यावर चालवून विहीत मर्यादेचे उल्लंघन करीत नाही हे तपासतील.

च) विहीत वेग मर्यादेचे पालन करणाऱ्या वाहनाच्या वेग नियंत्रकाचे सिल लॉक करतील.

छ) यानंतर वाहनास वेग नियंत्रक बसविल्याबाबत कार्यकारी अधिकारी विहीत नमुन्यात प्रमाणपत्र जारी करतील (प्रत संलग्न पान क्र. ४१)

ज) मोटार वाहन निरीक्षक / सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक यांनी सदर वाहनाची तपासणी करताना वाहनाचा विहीत केलेल्या वेग मर्यादेपेक्षा अधिक गतीने वाहन चालल्याचे लक्षात आल्यास कोणत्याही परिस्थितीत सदर वेग नियंत्रक सिलबंद करणार नाहीत.

**४) कार्यालय प्रमुखांची जबाबदारी –**

कार्यकारी अधिकाऱ्याने जारी केलेल्या प्रमाणपत्रानुसार, कार्यालय प्रमुखाने त्यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्यांकडून

वाहनास बसविलेला वेग नियंत्रक उपकरणाच्या मॉडेलची व क्रमांकाची नोंद, उत्पादकाचे नाव व दिनांक कार्यालयीन अभिलेखात तसेच योग्यता प्रमाणपत्रामध्ये घेणे अनिवार्य असेल. तसेच वाहनावर वेग नियंत्रक बसविल्यानंतर त्याबाबतची नोंद स्वतंत्र पृष्ठावर पृष्ठांकित करून नोंदणी प्रमाणपत्रासोबत देण्यात यावी.

८) परिवहन वाहनांना वेग नियंत्रक बसविणे व त्याला सील बसविण्याबाबतचे प्रात्यक्षिक / प्रशिक्षण व माहिती देण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे मुंबई महानगर प्रदेशाबाहेरील सर्व परिवहन कार्यालयातील प्रत्येकी किमान एका मोटार वाहन निरीक्षकास, तसेच मुंबई महानगर प्रादेशिक परिवहन प्राधिकरण क्षेत्रातील सर्व कार्यालयांमधील कार्यकारी अधिकाऱ्यांना प्रादेशिक परिवहन कार्यालय मुंबई (मध्य) येथे, कार्यशाळा आयोजित करण्यात येतील. सदर कार्यशाळेमध्ये प्रशिक्षीत झालेल्या मोटार वाहन निरीक्षकांनी, त्यांच्या कार्यालयातील सर्व मोटार वाहन निरीक्षकांना / सहाय्यक मोटार वाहन निरीक्षकांना आवश्यक ते प्रशिक्षण द्यावयाचे आहे. प्रशिक्षण कार्यक्रमाचे पर्यवेक्षण अपर परिवहन आयुक्त करतील.

९) मान्यताप्राप्त वेग नियंत्रक उत्पादकांना, राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये वितरक नेमणूक व दुरूस्ती केंद्रे सुरू करून त्यांची तसेच त्यांचे वेग नियंत्रकांच्या किंमतीची माहिती या कार्यालयास तसेच सर्व परिवहन कार्यालयांना सादर करण्याविषयी आवश्यक त्या सूचना जारी करण्यात येत आहत.

१०) वेग नियंत्रक बसविण्याच्या अंमलबजावणीबाबत कोणतीही प्रशासकीय अडचण उद्भवल्यास अपर परिवहन आयुक्त तसेच उप परिवहन आयुक्त (अ–१) यांच्याशी, तसेच तांत्रिक अडचण उद्भवल्यास श्री. नंदकिशोर नाईक, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल यांचेशी, तात्काळ संपर्क साधून शंका निरसन करून घ्यावे.

११) सदर अधिसूचनेची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी त्यांच्या क्षेत्रातील सर्व वाहतूक संघटना तसेच वाहन मालकांना अधिसूचनेत नमूद केलेल्या परिवहन चालकांना वेग नियंत्रक लागू केल्याबाबत अवगत करावे. तसेच स्थानिक वृत्तपत्रांद्वारे व्यापक स्वरूपात प्रसिद्धी करण्यात यावी.

१२) परिवहन वाहनांवर बसविण्यात आलेल्या वेग नियंत्रकांबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल, सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त कार्यालयांकडून संकलीत करून, प्रत्येक महिन्याचा व त्या महिन्यापर्यंतचा एकत्रित (Cumulative) कार्यालयनिहाय अहवाल, दरमहा १० तारखेपूर्वी परिवहन आयुक्त कार्यालयास सादर करावा.

१३) उपरोक्त सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावयाची जबाबदारी सर्व कार्यालय प्रमुखांची व सर्व कार्यकारी अधिकाऱ्यांची राहील.

परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहितीसाठी :

१) प्रधान सचिव, (परिवहन) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई – ४०००३२.

२) उप परिवहन आयुक्त (संगणक), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांना आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

त्यांना सूचित करण्यात येते की, परिवहन वाहनांना वेग नियंत्रक बसविण्याबाबतची नोंद अभिलेखात व योग्यता प्रमाणपत्र व त्याच्या अभिलेखात घेण्यासाठी VAHAN या संगणक प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्याबाबतची कार्यवाही त्वरीत करावी.

RTO PUNE COPY RIGHT

## कार्यकारी अधिकारी यांनी स्पीड गव्हर्नर चाचणी बाबतच्या तपासणीचा जारी करावयाचा अहवाल

१) मोटार वाहन क्रमांक – ..........................................

२) चॅसीस क्रमांक – ..........................................

३) इंजिन क्रमांक – ..........................................

४) वाहन चालकाचे नाव – ..........................................

५) वाहन चालकाची अनुज्ञाप्ती क्रमांक – ..........................................

६) स्पीड गव्हर्नर उत्पादकाचे नाव – ..........................................

७) स्पीड गव्हर्नरच्या मान्यतेच्या वैधतेचा दिनांक (एआरएआय प्रमाणपत्र वैधता दिनांक) – ..........................................

८) स्पीड गव्हर्नर उपकरणाचा क्रमांक – ..........................................

९) निर्धारीत कमाल वेग मर्यादा – ................... किमी प्रती तास

१०) विहीत केलेल्या ५ ठिकाणी विहीत – ..........................................
केलेल्या प्रकारचे सील लावले आहे – ..........................................
किंवा नाही व सील क्रमांक – ..........................................

वरीलप्रमाणे प्रमाणित करण्यात येत आहे.

वाहन चालकाची स्वाक्षरी

कार्यकारी अधिकाऱ्याची दिनांकीत स्वाक्षरी व नाव

दिनांक :

(सदर अहवाल दोन प्रतीत सादर करावा. यातील एक अहवाल कार्यालयीन अभिलेखात नोंद घेण्यासाठी व एक प्रत वाहन मालकास देण्यात यावा.)

RTO PUNE COPY RIGHT

क्र. एमव्हीआर०३०१/सीआर-६४६(बी)/का.२(४) / जा.क्र. १७२५२
परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, ३/४ मजला, डॉ. आंबेडकर
उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०००५१.
दिनांक : ३१/१२/२०१२

प्रति,
सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी,
सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी.

**विषय : ई.सी.यू. प्रणालीयुक्त वेग नियंत्रक यंत्रणा बसविलेल्या बसेस स्कूल बसेस म्हणून नोंदणीसाठी स्विकारणेबाबत....**

१. ज्या स्कूल बसेसना मूळ बस उत्पादकानेच ई.सी.यू. प्रणालीयुक्त वेगनियंत्रक बसविले आहेत अशा वेगनियंत्रकास सिल करण्याची तरतूद नसल्याने, स्कूल बसेसची नोंदणी करण्यात येत नसल्यामुळे वाहन मालकास अडचणी येत असल्याबाबत नोंदणी प्राधिकाऱ्यांनी तसेच स्कूल बस ओनर्स असोसिएशन यांनी या कार्यालयाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

२. केंद्र शासनाने दिनांक १९/८/२०११ रोजीच्या जीएसआर ६३१ (ई) दिनांक १९/८/२०११ नुसार केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ११८ मध्ये वेगनियंत्रकाबाबत सुधारणा करण्यासाठी प्रारूप नियम प्रसिद्ध केले. त्यास प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विधी मंत्रालयास तपासणीसाठी पाठविण्यात आल्या असून सदर अधिसूचना यथावकाश अंतिम करण्यात येणार आहेत.

३. उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता, राज्यातील सर्व नोंदणी प्राधिकारी यांना सूचित करण्यात येते की, ज्या बसेसना मूळ बस उत्पादकानेच ई.सी.यू. प्रणालीयुक्त वेगनियंत्रक बसविले आहेत अशा बसेसच्या बाबतीत वाहन मालकाने पुढील नमुन्यात वाहन उत्पादकाकडून प्रमाणपत्र सादर केल्यास, अशा बसेस स्कूल बस म्हणून नोंदणीसाठी स्विकारण्यात याव्यात.

**Certificate**

Certified that the vehicle (Brand name of the vehicle ____________) bearing Chassis Number _________________ Engine Number ____________ fitted with the Electronic Control Unit (Speed Limiting Device) of __________________ (make) complies with the provision of Rule 118 of Central Motor Vehicles Rules, 1989 i.e. conforms to the Standards AIS : 018 (Certificate No. _____________________ dated __________ issued by the Testing Agency ____________________________), and the maximum speed of the vehicle is electronically / through engine management system set at __________ km per hours by us and it is tamperproof.

Date :
Seal :
Signature of the manufacturer / dealer

RTO PUNE COPY RIGHT

३. वरील सूचनेप्रमाणे प्रमाणपत्र घेऊन मूळ बस उत्पादकाकडून ई.सी.यू. प्रणालीयुक्त वेगनियंत्रक बसविले आहेत अशा बसेसची स्कूल बस म्हणून नोंदणी करण्याची कार्यवाही करावी. मात्र ही नोंदणी या संबंधात राज्य / केंद्र शासनाकडून ई.सी.यू. संबंधाने दिल्या जाणाऱ्या आदेशांचे अधीन राहील असा स्पष्ट उल्लेख नोंदणी अधिकाऱ्यांनी न चूकता नोंदणीपत्रावर करावा.

परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : प्रधान सचिव, गृह विभाग (परिवहन), ३० वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई – ४००००५ यांना या कार्यालयाचे पत्र क्र. एमव्हीआर ०३०१/सीआर–६४६(बी)/का.२(४) / जा.क्र. १६२९७, दिनांक १०/१२/२०१२ च्या अनुषंगाने सादर.

प्रत माहितीकरिता :
स्कूल बसमालक संघटना / असोसिएशन



# स्कूल बस तपासणी अहवाल / सूची

वाहनाच्या मूळ प्रारूपाला परिवहन आयुक्त कार्यालयाने दिलेला मान्यता आदेश क्र. दिनांक

वाहन उत्पादकाचे नाव : मॉडेल :

इंजिन क्र. : चेसीस क्र. :

वाहन क्र. : आसनक्षमता :

महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बस करिता विनियम) नियम, २०११ नुसार विहित केलेल्या तरतूदींनुसार वाहनाची तपासणी केली असून त्याबाबतचा अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

| नियम क्र. | विविध तरतूदी | शेरा<br>पूर्तता करीत असल्यास ☑ अशी खूण करावी.<br>नसल्यास ☒ अशी खूण करावी. |
|---|---|---|
| १०(१) | १) वाहनाचा रंग पिवळा आहे.<br>२) वाहनाच्या पुढच्या आणि मागच्या बाजूला ''स्कूल बस'' असे शब्द लिहिलेले आहेत.<br>३) वाहनाच्या खिडकीखाली सर्व बाजूंनी १५० मिलीमीटर रूंदीचा विटकरी पट्टा रंगविलेला आहे.<br>४) सदर पट्ट्यावर शाळेचे नाव लिहिलेले आहे. | ☐<br>☐<br>☐<br>☐ |
| १०(२) | शालेय कंत्राटाशिवाय अन्य कोणतेही कंत्राट असल्यास वाहनाच्या खिडकीखाली सर्व बाजूंना ४०० मिलीमीटर रूंदीच्या पिवळ्या पट्टीने रंगविलेले आहे. | ☐ |
| १०(८) | चढण्याच्या खालच्या पायरीच्या वरच्या कडेची जमिनीपासून उंची ३०० मिलीमीटर पेक्षा जास्त नसावी. तसेच, त्यापेक्षा जास्त असल्यास एक अतिरिक्त पायरी बसविण्यात आली आहे. (तथापि, दि. २५/६/२०१२ पूर्वी नोंदणी झालेल्या बसची खालच्या पायरीची उंची ३५० मि.मी. पर्यंत असल्यास अतिरिक्त पायरी करण्याची आवश्यकता नाही.) | ☐ |
| १०(९) | १) बसच्या दोन्ही बाजूला बहिर्वक्र भिंगाचे आरसे बसविलेले आहेत.<br>२) चालकाला बसच्या आतील भागातील सर्व दृश्य स्पष्ट दिसण्यासाठी मोठा पॅराबोलिक आरसा बसविला आहे. | ☐<br>☐ |
| १०(१०) | प्रवेश दरवाजाच्या पायऱ्यांसोबत आधारासाठी हाताने धरावयाचा दांडा आहे. | ☐ |

RTO PUNE COPY RIGHT

<table>
<tr><th>नियम क्र.</th><th>विविध तरतूदी</th><th>शेरा<br>पूर्तता करीत असल्यास ☑ अशी खूण करावी.<br>नसल्यास ☒ अशी खूण करावी.</th></tr>
<tr><td>१०(११)</td><td>गॅंगवेकडील आसनाच्या मागच्या / वरच्या कडेवर अथवा बाजूला आधारासाठी हॅंडल आहेत किंवा आसनांच्या रचनेत हॅंडल्स अंतर्भूत (इंटीग्रल) आहेत. (ठराविक अंतरावर उभे स्टॅंचियन पोल बसविलेले असल्यास हॅंडल्सची तरतूद करणे आवश्यक नाही.)</td><td>मागच्या / वरच्या / कडेच्या बाजूला हॅंडल्स आहेत किंवा इंटीग्रल हॅंडल्स आहेत.</td></tr>
<tr><td>१०(११क)</td><td>स्टेपवेल लगतच्या आसनाजवळ एक उभा स्टॅंचियन पोल व त्या पोलला बसच्या कडेपासून जोडणारे दोन आडवे दांडे ज्यांची उंची तळपृष्ठापासून अनुक्रमे ६० व ९० सेमी आहे.</td><td>☐</td></tr>
<tr><td>१०(११ख)</td><td>अॅल्युमिनियम किंवा पावडर कोटेड स्टीलचे किमान अर्धा इंच व्यासाचे आडवे-उभे दांडे अथवा जाळी वापरुन चालक कक्ष प्रवासी कक्षापासून वेगळा केला आहे. (आडवे उभे बार वापरुन पार्टीशन केले असल्यास त्या उभ्या आडव्या दांड्यांमधील मोकळी जागा ३० सेमी ३० सेमी पेक्षा जास्त असणे अपेक्षित नाही.)</td><td>☐</td></tr>
<tr><td>१०(१२)</td><td>प्रेशर हॉर्न जोडलेला आहे / नाही.</td><td>आहे / नाही<br>(लागू असेल त्या ठिकाणी ☑ असे चिन्ह द्यावे.)</td></tr>
<tr><td>१०(१३)</td><td>१) महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९२ मध्ये नमूद केलेल्या वस्तूंचा / औषधांचा अंतर्भाव असणारी सुसज्ज प्रथमोपचार पेटी आहे.<br>२) आय. एस. आय. मार्क असलेली 'ए बी सी' प्रकारची अग्नीशमन उपकरणे चालकाच्या कक्षामध्ये / चालकाच्या आसनाजवळ ठेवलेली आहेत.
<table>
<tr><th>आसनक्षमता (चालक वगळता)</th><th>उपकरणाची क्षमता</th><th>उपकरणांची संख्या</th><th>ठेवण्याची जागा</th></tr>
<tr><td>१२ पर्यंत</td><td>२ किलो</td><td>१</td><td>चालक कक्षात / चालकाच्या आसनाजवळ</td></tr>
<tr><td>१२ ते २०</td><td>५ किलो</td><td>१</td><td>चालक कक्षात</td></tr>
<tr><td>२० पेक्षा जास्त</td><td>५ किलो</td><td>२</td><td>चालक कक्षात एक आणि आपत्कालीन दरवाजाजवळ दुसरे किंवा दोन्ही चालक कक्षात</td></tr>
</table></td><td>☐<br>☐
<table>
<tr><th>आसनक्षमता (चालक वगळता)</th><th>उपकरणाची क्षमता</th><th>उपकरणांची संख्या</th><th>ठेवण्याची जागा</th></tr>
<tr><td></td><td>......किलो</td><td></td><td></td></tr>
</table></td></tr>
</table>

RTO PUNE COPY RIGHT

| नियम क्र. | विविध तरतूदी | शेरा<br>पूर्तता करीत असल्यास ☑ अशी खूण करावी.<br>नसल्यास ☒ अशी खूण करावी. |
|---|---|---|
| १०(१४) | १) आसनांच्या चौकटीला पुढील बाजूस तळापासून ३ इंच उंचीवर अर्धा इंच व्यासाचा आडवा रॉड बसविला आहे. (आसनांखाली दप्तरे ठेवण्यासाठी रॅक्स बसविलेल्या असल्यास आडव्या रॉडची तरतूद आवश्यक राहणार नाही.)<br>२) वरच्या बाजूस दप्तरे ठेवण्यासाठी रॅक्स बसविल्या आहेत (आसन क्षमता १२ पेक्षा जास्त असल्यास) | ☐ |
| १०(१६) | धोक्याचे इशारे देणारी प्रकाशयोजना (लाईट) बसविली आहे. | ☐ |
| १०(१७) | दोन दांड्यांमधील अंतर पाच सेंटीमीटर पेक्षा अधिक नसलेले, ४ आडवे स्टीलचे दांडे खिडकीच्या बाहेरील बाजूने जोडलेले आहेत. | दोन दांड्यांमधील अंतर .......<br>सेमी दांड्यांची संख्या ......... |
| १०(१८) | वाहनाचा वेग ४० किलोमीटर प्रति तास पेक्षा अधिक असणार नाही, अशा पद्धतीने वाहनाला वेग नियंत्रक बसविला आहे व सिल केला आहे. | वेगनियंत्रक उत्पादकाचे नाव ............. मॉडेल नं. ...........<br>कमाल वेग मर्यादा ..............<br>किमी / तास |
| १०(१९) | अ) बसच्या मागे व पुढे शालेय मुलगा व मूलीचे चित्र असलेले ३५० × ३५० मिलीमीटर आकाराचे स्टीकर / फलक लावण्यता आले आहेत.<br>ब) त्यातील मुलांच्या चित्रांची उंची २५० मिलीमीटर पेक्षा कमी नाही.<br>क) चित्रांच्या खाली काळ्या रंगांमध्ये ''स्कूल बस'' लिहिले आहे व त्या अक्षरांची उंची १०० मिलीमीटर आहे. (तथापि, बसच्या बांधणीमुळे वरील आकाराचे स्टीकर / फलक लावणे शक्य नसल्यास २०० × २०० मिलीमीटर आकाराचे स्टीकर मुलांच्या चित्रांच्या व अक्षरांच्या आकारात योग्य बदलासह प्रदर्शित करणे पुरेसे असेल) | १) स्टीकरची मोजमापे ......... × ......... मिलीमीटर<br>२) मुलांच्या चित्रांची उंची ........... मिलीमीटर<br>३) स्कूल बस अक्षरांची उंची ........... मिलीमीटर |
| १०(२०) | १) बारा आसनक्षमतेपर्यंतच्या स्कूल बस व्यतिरिकत प्रत्येक स्कूल बसवर शाळेची ओळख दर्शविणारा ३० इंच × ८ इंच आकाराचा फलक पुढे आणि मागे वरच्या बाजूस दिसेल असा लावला आहे.<br>२) प्रवेशद्वारावरील फलक १८ इंच × ८ इंच आकाराचा असावा. | १) दर्शनी फलकाचे माप ........... इंच × ....... इंच<br>२) प्रवेशद्वारावरील फलकाचे माप ......... इंच × ........... इंच |

RTO PUNE COPY RIGHT

| नियम क्र. | विविध तरतूदी | शेरा<br>पूर्तता करीत असल्यास ☑ अशी खूण करावी.<br>नसल्यास ☒ अशी खूण करावी. |
|---|---|---|
| १०(२१) | १) बारा आसनक्षमतेपर्यंतच्या स्कूल बसवर शाळेची ओळख दर्शविणारा १८ इंच × ८ इंच आकाराचा फलक पुढे आणि मागे वरच्या बाजूस दिसेल असा लावला आहे. | १) फलकाचे माप ......... इंच × ........... इंच |
| १०(२३) | १) बसची संपूर्ण बॉडी स्टील बॉडीसह बंद स्वरूपाची आहे.<br>२) वाहनामध्ये मुलांसाठी लॉक यंत्रणा जोडलेली आहे. | ☐ |
| १०(२७) | १) राज्य परिवहन प्राधिकरण ठराव ३७ / २००९ नुसार बसच्या उजव्या बाजूस मागील अर्ध्या भागात, बसच्या तळपृष्ठापासून खिडकीच्या वरच्या कडेच्या उंचीपर्यंत एक आपत्कालिन दरवाजा आहे (*)<br>२) दरवाजा आतून व बाहेरून दोन्ही बाजूंनी उघडण्यासाठी त्याला हँडल आहे.<br>३) विद्यार्थ्यांना सहजासहजी न उघडता येण्यासाठी हँडल प्लॅस्टिक / काचेचे आच्छादित आहे.<br>४) नवीन बसमध्ये आपत्कालिन दरवाजा उघडला गेल्यास घंटा वाजून अथवा दिव्यांची उघडझाप होऊन चालकास सूचना मिळण्याची सोय आहे.<br>५) या दरवाजाशिवाय मागील बाजूस ३९ इंच × २३ ३/८ इंच या मापाची आपत्कालिन खिडकी आहे.<br>६) सदर खिडकीस वरच्या बाजूस बिजागऱ्या असून, आतून व बाहेरून दोन्ही बाजूंनी उघडण्यासाठी त्याला हँडल आहे. | ☐<br>☐<br>☐<br>☐<br>आपातकालीन खिडकीची मापे (......... इंच × ........... इंच) |
| | (तथापि, उत्पादकाने मागील बाजूस वाहनाच्या पूर्ण रूंदीइतका आपत्कालीन दरवाजा केला असल्यास अथवा दि. ११/९/२००९ पूर्वी राज्य परिवहन प्राधिकरण ठराव ३६/२००९ प्रमाणे बसच्या मागील बाजूस ५४० मिलीमीटर × १२०० मिलीमीटर आकाराचा दरवाजा केला असल्यास त्याला वरील तरतूद लागू राहणार नाही.) | |

प्रमाणित करण्यात येते की, ......................... उपर्निर्दीष्ट तरतुदींप्रमाणे मी वाहनाची तपासणी केली असून सदर तरतुदींची पूर्तता वाहन करीत आहे.

मोटार वाहन निरीक्षक

मी दिनांक ..................... रोजी वरील वाहनाची तपासणी केली असून मो.वा.नि. यांचा अहवाल बरोबर आहे.

सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी

RTO PUNE COPY RIGHT

**महाराष्ट्र शासन राजपत्र**
**असाधारण भाग चार – ब**
(वर्ष ४, अंक २५(२)) शुक्रवार, मे ४, २०१२ / वैशाख, १४, शके १९३४ (पृष्ठे ७)
किंमत : रूपये ९.००
असाधारण क्रमांक ७२

**प्राधिकृत प्रकाशन**
महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक – अ आणि एक – ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.
**गृह विभाग**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०००३२, दिनांक ४ मे २०१२
**अधिसूचना**

महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम, २०११.

क्रमांक एमव्हीआर ०३१२/प्र.क्र. २२७/परि–२ महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम, २०११, याच्या नियम १२ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या अनुरोधाने महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम, २०११ मधील नियम १० च्या खंड (तीन) च्या तरतुदींमध्ये

भाग चार ब ७२–१

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार – ब, मे ४, २०१२/वैशाख १४, शके १९३४

अंशतः फेरबदल करून खालीलप्रमाणे सूट देत आहे.

| वयोमर्यादा | कालमर्यादा |
|---|---|
| (मुंबई बाहेरील बस गाड्यांच्या बाबतीत) | |
| (एक) स्कूल बसच्या सुरूवातीच्या नोंदणीच्या दिनांकापासून १५ वर्षे मर्यादेपर्यंत जूनी असण्याची अट | दि. १ मे २०१३ पासून सक्तीचे |
| (दोन) सुरूवातीच्या नोंदणीच्या दिनांकापासून १८ वर्षे मर्यादेपर्यंतच्या जुन्या असलेल्या स्कूल बस | दि. ३० एप्रिल २०१३ पर्यंत चालविण्यास परवानगी |

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**भि. रा. वाढवे,**
**शासनाचे सहसचिव**

RTO PUNE COPY RIGHT

# जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समितीच्या बैठकीसाठी स्कूल बस वाहतूक संघटनेच्या प्रतिनिधीस आमंत्रित करणे.

**महाराष्ट्र शासन**

गृह (परिवहन) विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
शासन परिपत्रक क्रमांक : एमव्हीआर ०३१२/प्र.क्र. २२७/परि–२

दिनांक ७ मे, २०१२

**परिपत्रक :**

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतूकीसंबंधी स्कूल बस धोरणानुसार महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम २०११ दिनांक २२/३/२०११ च्या शासन अधिसूचनेन्वये प्रसिद्ध करण्यात आले आहेत. या नियमावलीतील नियम ५ मधील तरतूदीनुसार मुलांची सुरक्षितता आणि शाळेत त्यांची ने–आण करण्याच्या मुद्दांवर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी आणि शिफारस करण्यासाठी, प्रत्येक जिल्ह्याकरीता पोलीस आयुक्त किंवा जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या अध्यक्षतेखाली एक जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समिती गठीत करण्याबाबत विहित केले आहे. या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत शासन परिपत्रक, गृह विभाग क्र. एमव्हीआर ०८०८/प्र.क्र. १५३/परि–२, दिनांक ३० एप्रिल २०११ अन्वये सर्व संबंधितांना निर्देश देण्यात आलेले असून त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.

२. स्कूल बस नियमावलीतील तरतूदीच्या अंमलबजावणीबाबत स्कूल बस वाहतूकदार संघटनेने जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समितीमध्ये संघटनेच्या प्रतिनिधींना बैठकीस आमंत्रित करण्याबाबत केलेल्या विनंतीस अनुसरून यापुढे, जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समितीच्या बैठकीस स्कूल बस वाहतूकदार संघटनेच्या प्रतिनिधीस आवश्यकतेप्रमाणे आमंत्रित करण्यात यावे, असे निर्देश देण्यात येत आहेत.

३. यानुसार, सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार.

(रा. गो. गायकवाड)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग,
महाराष्ट्र शासन

प्रति,
१. प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

# शाळेच्या मोठ्या सुट्टीच्या कालावधीत विशेष परवाने मंजूर करणे

क्र. एमव्हीए–०१११/सीआर–४०३/का. २(२)/जा.क्र. ६७०३
परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, ३/४ मजला, डॉ. आंबेडकर
उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व),
मुंबई – ४०००५१.
दिनांक : २३/०५/२०१२

प्रति,
सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी,
सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

**विषय : स्कूल बस म्हणून नोंदणी झालेल्या वाहनांना शाळेच्या मोठ्या सुट्टीच्या कालावधीत, विशेष परवाने मंजूर करणेबाबत.**

१. स्कूल बस नोंदणी झालेल्या स्कूल बसेस / व्हॅनच्या मालकांना शाळेच्या मोठ्या सुट्टीच्या कालावधीत परिवहन कार्यालयामध्ये स्वत:च्या परिवारासाठी मुंबई बाहेर वाहन घेऊन जाण्यास तात्पुरता परवाना मिळण्यास परिवहन कार्यालयाकडून सहकार्य मिळत नसल्याची निवेदने प्राप्त झाली आहेत.

२. एप्रिल व मे महिना तसेच दिपावली, ख्रिसमस या कालावधीत शाळेला सुट्टी असल्याकारणाने स्कूल बस म्हणून नोंदणी झालेल्या वाहनांमधून विद्यार्थ्यांची वाहतूक बंद असते. सदर वाहनांना शालेय विद्यार्थी वाहतुकीचे परवाने जारी केल्यामुळे अन्य व्यवसाय करता येत नाही. त्यामुळे सदर कालावधीत वाहन मालकांनी त्यांच्या कुटुंबासाठी सदर वाहनांचा उपयोग करण्याकरिता योग्य ती फी आकारून तात्पुरता परवाना मिळावा म्हणून स्कूल बस / व्हॅनच्या मालकांनी या कार्यालयास विनंती केली आहे.

३. शासनाने दि. २२/३/२०११ रोजीच्या अधिसूचनेद्वारे शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीच्या दृष्टीकोनातून स्कूल बस नियमावली लागू केली आहे. त्यानुसार स्कूल बसेसना परवाने जारी करण्यात येतात.

४. स्कूल बस / व्हॅनच्या मालकांच्या विनंतीचा विचार करता, स्कूल बस म्हणून नोंदणी झालेल्या वाहनांना विविध कारणास्तव एक आठवडा किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीच्या सुट्ट्यांमध्ये मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ८८(८) नुसार विशेष परवाने देता येतील.

५. शासन अधिसूचना दि. १६/१०/२०१० नुसार मोटार वाहनांच्या विविध प्रवर्गाकरीता करातून सूट देण्यात आलेली आहे. सदर कराची सूट ही विशिष्ट प्रयोजनाकरिता दिलेली असते. त्यामुळे स्कूल बस वाहन मालकांस विशेष परवाना देतांना अशा विशेष परवान्याचे कालावधीसाठी येणारी, मुळ कर व सवलतीचा कर यातील फरकाची रक्कम भरून घेवूनच असे विशेष परवाने देण्यात यावेत.


६. विशेष परवाने जारी केल्यानंतर सदर वाहनांचा वापर अन्य प्रयोजनासाठी होऊ नये म्हणून वेळोवेळी अशा वाहनांची तपासणी करण्यात यावी. जर सदर वाहनांचा / विशेष परवान्याचा गैरवापर केल्याचे आढळून आल्यास, सदर वाहन मालक / चालकाविरूद्ध मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम ६६/१९२ (अ) अन्वये कारवाई करावी.

RTO PUNE COPY RIGHT

७. सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, वरील वर दिलेल्या सूचनांनुसार स्कूल बस म्हणून नोंदणी झालेल्या वाहनांना, शाळेच्या एक आठवडा किंवा त्यापेक्षा मोठ्या सुट्टीच्या कालावधीत, विशेष परवाने देण्यासाठी अर्ज केल्यास, त्यांना विशेष परवाने जारी करावेत. तसेच अशा वाहनाचा गैरवापर करून अन्य प्रयोजनाकरिता सदर वाहनाचा वापर केला तर, त्या वाहन मालक / चालकांच्या विरूद्ध मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम ६६/१९२(अ) अन्वये कारवाई करावी आणि त्या वाहनाकरिता दिलेली कर सवलत रद्द करावी.

परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : सर्व नियंत्रक अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांना माहितीकरीता
प्रत सादर : प्रधान सचिव, गृह (परिवहन) विभाग, मंत्रालय, मुंबई–४०००३२.



# शाळेतील विद्यार्थ्यांना ने-आण करणाऱ्या स्कूल बस बाबतच्या मार्गदर्शक सूचना

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक : पीआरई २००८ / प्र.क्र. ५०६ / प्राशि–१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक २६ जून २०१२

वाचा : शासन निर्णय क्रमांक : पीआरई २००८/प्र.क्र. ५०६/प्राशि–१ दि. १४ सप्टेंबर २०११.

**प्रस्तावना :** राज्यामध्ये शालेय विद्यार्थ्यांना शाळेत जाण्या–येण्याकरिता सुनियोजित सुरक्षित वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी स्कूल बस नियम आणि विनियम, २०११ हे दिनांक १४ सप्टेंबर, २०११ रोजी विहित करण्यात आले आहेत. त्यानुसार संबंधित शाळा व्यवस्थापन आणि बस सेवा देणाऱ्या कंत्राटदारांमध्ये आवश्यक सामंजस्य करार करणे बंधनकारक आहे. असे सामंजस्य करार करताना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :** उक्त नियमाच्या अनुषंगाने शाळा व्यवस्थापन आणि बस सेवा देणाऱ्या कंत्राटदारांमध्ये आवश्यक सामंजस्य करार करताना सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा तसा करण्याचा उद्देश असलेल्या कृत्याबद्दल संबंधित प्राचार्याविरूद्ध / शाळा व्यवस्थापनाविरूद्ध कोणताही खटला / वाद वा इतर कारवाई करता येणार नाही.

२. शाळेतील मुलांची सुरक्षितपणे ने–आण करण्यासठी यापुढे महाराष्ट्र मोटार वाहन (स्कुल बसकरिता विनियम) नियम २०११ मध्ये वेळोवेळी होणाऱ्या सुधारणा शालेय व्यवस्थापन / प्राचार्य यांना बंधनकारक राहतील.

३. वरीलप्रमाणे शालेय शिक्षण संहितेत यथावकाश आवश्यक तरतूद समाविष्ठ करण्यात येईल. तोपर्यंत प्रस्तुत शासन निर्णयातील तरतूदी लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार.

(ना. उ. राराळे)
शासनाचे सह सचिव

PHOTO PUNE COPY RIGHT

क्र. एमव्हीआर०११०/सीआर–९४५(डी)/का.२(३) / जा.क्र. १०७३३
परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, ३/४ मजला, डॉ. आंबेडकर
उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व),
मुंबई – ४०००५१.
दिनांक : २८/०८/२०१२

प्रति,
सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी,
सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी.

**विषय : महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) (पहिली सुधारणा) नियम २०१२**

संदर्भ : १) शासन पत्र क्र. एमव्हीआर ०३१२ / प्र.क्र. २२७ / पुनर्बांधणी–१ / परि–२, दि. २५/७/२०१२
२) शासन अधिसूचना क्र. एमव्हीआर ०३१२ / प्र.क्र. २२७ / पुनर्बांधणी–१ / परि–२, दि. २६/६/२०१२
३) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. पीआरई २००८/ प्र.क्र. ५०६/प्रा.शि.–१, दि. २६/६/२०१२
४) या कार्यालयाचे पत्र क्र. एमव्हीआर०११०/सीआर–९४५(डी) / का.२(३) / जा.क्र.१०२६१, दि. ६/८/२०१२

१. शासनाने महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम, २०११ मध्ये शासन अधिसूचना दि. २५/६/२०१२ नुसार सुधारणा केली असून त्याच्या प्रती आपणास आवश्यक कार्यवाहीकरिता दि. ३०/६/२०१२ रोजी ई–मेल द्वारे पाठविण्यात आल्या आहेत. तसेच या अनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र. ४ अन्वये स्कूल बस अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सूचना जारी केलेल्या आहेत.

२. महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम, २०११ नुसार शाळा व्यवस्थापन आणि बससेवा देणाऱ्या कंत्राटदारामध्ये आवश्यक सामंजस्य करार करणे बंधनकारक आहे. तथापि, असे सामंजस्य करार करताना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

त्यानुसार शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. पीआरई २००८ / प्र.क्र. ५०६ / प्रा. शि. १, दि. २६/६/२०१२ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय : १) उक्त नियमांच्या अनुषंगाने शाळा व्यवस्थापन आणि बससेवा देणाऱ्या या कंत्राटदारांमध्ये आवश्यक सामंजस्य करार करताना सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा तसा करण्याचा उद्देश असलेल्या कृत्यांबद्दल संबंधित प्राचार्यांविरूद्ध / शाळा व्यवस्थापनाविरूद्ध कोणताही खटला / वाद वा इतर कारवाई करता येणार नाही.

२) शाळेतील मुलांची सुरक्षितपणे ने – आण करण्यासाठी यापुढे महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम, २०११ मध्ये वेळोवेळी होणाऱ्या सुधारणा शालेय व्यवस्थापन / प्राचार्य यांना बंधनकारक राहतील.

३) वरीलप्रमाणे शालेय शिक्षण संहितेत यथावकाश आवश्यक तरतूद समाविष्ट करण्यात येईल. तोपर्यंत प्रस्तुत शासन निर्णयातील तरतूदी लागू राहतील.

३. आपणास सूचित करण्यात येते की, दि. २५/६/२०१२ रोजीच्या अधिसूचनेद्वारे स्कूल बस नियमावलीतील विहीत करण्यात आलेल्या तरतूदी तसेच शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दि. २६/६/२०१२ रोजीच्या शासन निर्णयाची प्रत, जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व प्राथमिक यांचेमार्फत आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांना / प्राचार्यांना देण्यात यावी.

शालेय व्यवस्थापन आणि बससेवा देणाऱ्या कंत्राटदारामध्ये आवश्यक सामंजस्य करार करणे शालेय व्यवस्थापनावर बंधनकारक करण्यात आले असल्याने त्याची त्वरीत अंमलबजावणी करण्याच्या सूचना आपल्या स्तरावरून सुद्धा जारी कराव्यात. त्याचबरोबर सदर शासन निर्णयाची प्रत सर्व स्कूल बस वाहतूकदार संघटनांनादेखील देण्यात यावी.

४. याबाबत स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांना (जिल्हा पोलीस अधिक्षकांमार्फत / पोलीस आयुक्तांमार्फत) लेखी अवगत करावे.

५. सदर शासन निर्णयास स्थानिक स्तरावर व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी.

परिवहन आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :-

१) सर्व नियंत्रक अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई

२) परिवहन उप आयुक्त (संगणक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सूचित करण्यात येते की, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने जारी केलेल्या दि. २६/६/२०१२ रोजीच्या शासन निर्णयाची प्रत विभागाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करावी.




RTO PUNE
COPYRIGHT

क्र. एमव्हीपी ०९१२/सीआर ३३४/ का. २(३)/जा. क्र. १५३०३
परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, ३/४ मजला, डॉ. आंबेडकर
उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०००५१.
दिनांक : १६/११/२०१२

प्रति,
सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी,
सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी.

**विषय : महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम, २०११ च्या अंमलबजावणीबाबत.**

**संदर्भ : १) शासन अधिसूचना क्र. एमव्हीआर ०८०८/सीआर-१५३, / परि-२, दि. २२/३/२०११**
**२) शासन अधिसूचना क्र. एमव्हीआर ०३१२/प्र.क्र. २२७/पुर्नबांधणी-१/ परि-२, दि. २६/६/२०१२**

१. शासन अधिसूचना दि. २२/३/२०११ नुसार शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतूकीसंबंधी महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम, २०११ लागू केले आहेत. तसेच शासनाने दिनांक २५/६/२०१२ रोजीच्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम, २०११ मध्ये सुधारणा केली आहे.

२. अंकुश शिक्षण संस्था, नागपूर या संस्थेने कळविले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या दि. २२/३/२०११ रोजीच्या अधिसूचनेतील नियम २ (ई) मध्ये स्कूल बसची कॉन्ट्रॅक्ट कॅरेज बस अशी व्याख्या केली असून खास शाळा व कॉलेजमधील मुलांच्या वाहतूकीच्या दृष्टीने त्याप्रमाणेच स्कूल बसची बांधणी करण्यात येते. परंतु प्रादेशिक परिवहन अधिकारी / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडून वेगवेगळे अर्थ लावण्यात येत आहेत. काही प्रादेशिक परिवहन अधिकारी / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या मते सदर अधिसूचना ही फक्त दहावी पर्यंतच्या विद्यार्थी वाहतूकीसाठी लागू असून, कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या वाहतूकीसाठी लागू नाही. तर काही प्रादेशिक परिवहन अधिकारी / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी मते सदर अधिसूचना सर्व शाळा, कॉलेज व इतर शैक्षणिक संस्थांच्या विद्यार्थ्यांच्या वाहतूकीसाठी लागू आहे. त्यामुळे सदरची अधिसूचनेतील बाबी त्यांच्या कॉलेजला स्पष्ट होत नाहीत. त्यामुळे सदरची बाब स्पष्ट होऊन या कामकाजात एकसारखेपणा आणून तसे महाराष्ट्रातील सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना अवगत करण्याची विनंती केली आहे.

३. शासनाने दि. २२/३/२०११ रोजीच्या अधिसूचनेद्वारे शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतूकीच्या दृष्टीकोनातून स्कूल बस नियमावली लागू केली आहे. सदर नियमावली मधील नियम २ (ड) मध्ये ''स्कूल बस'' ची व्याख्या दिलेली असून सुधारीत केल्याप्रमाणे ती पुढीलप्रमाणे आहे -

''स्कूल बस याचा अर्थ शाळा, महाविद्यालये आणि इतर शैक्षणिक संस्थांकरिता विशेषरित्या रचना केलेली व तयार केलेली कंत्राटी वाहने असा असून त्यामध्ये १२ पर्यंत आसनक्षमता असलेल्या चारचाकी हलक्या मोटार वाहनांचा आणि परिवहन आयुक्तांकडून वेळोवेळी मान्यता देण्यात येतील अशी आसनव्यवस्था व सुरक्षा वैशिष्ट्ये असलेल्या टणक छताच्या व बंदिस्त प्रवासी कक्षांनीयुक्त तीनचाकी ऑटोरिक्षाचा समावेश असेल.''

४. स्कूल बसच्या व्याख्येत जरी शाळेशिवाय महाविद्यालय आणि इतर शैक्षणिक संस्थांच्या बसेसचा समावेश केला असला तरी मूलत: शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षित वाहतूक करणे या उद्देशाने स्कूल बस नियमावली लागू केली आहे.

५. शासनाने दि. १६/१०/२०१० रोजी स्कूल बसेसना करातून सूट देण्यासाठी अधिसूचना जारी केली आहे. सदर अधिसूचनेच्या प्रयोजनार्थ स्कूल बसच्या शब्दप्रयोगात, मुलांची किंवा विद्यार्थ्यांची ने–आण करण्यासाठी आणि वापर करण्यासाठी व माध्यमिक शिक्षण स्तरापर्यंतच्या शाळेतील मुलांची किंवा विद्यार्थ्यांची ने–आण करण्यासाठी नोंदणी केलेल्या चारचाकी मोटार वाहनाचा समावेश होतो असे स्पष्टीकरण दिले आहे.

६. वरील तरतूदींचा विचार करता स्कूल बस नियमावली ही माध्यमिक शिक्षण स्तरापर्यंतच्या विद्यार्थ्यांची ने–आण करणाऱ्या बसेसला लागू आहे.

७. सबब सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, स्कूल बस नियमावलीतील तरतूदींप्रमाणे माध्यमिक शिक्षण स्तरापर्यंतच्या विद्यार्थ्यांची ने–आण करणाऱ्या बसेसला लागू होत असल्याने त्यानुसार स्कूल बसेसची नोंदणी करावी व परवाने जारी करावेत. शालेय शिक्षण विभागाने दिनांक १४/९/२०११ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे शाळेतील विद्यार्थ्यांना ने–आण करणाऱ्या बसेसबाबत सूचना जारी केल्या आहेत.

सह परिवहन आयुक्त,<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई

RTO PUNE COPY RIGHT

प्रत :

१) प्रधान सचिव, गृह विभाग (परिवहन), ३० वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ०५ यांना माहितीकरिता सादर.
२) अंकुश शिक्षण संस्था (रायसोनी ग्रुप) ३४५, श्रद्धा हाऊस, ६ वा मजला, किंग्ज वे, नागपूर ४४० ००१ यांना माहितीकरिता अग्रेषित.
३) सर्व नियंत्रक अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई.

क्र. एमडब्ल्यूपी–०३००/सीआर–९४५(डी)/का.२(३) जा.क्र. १७२३४
परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, ३/४ मजला, डॉ. आंबेडकर
उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व),
मुंबई – ४०००५१.
दिनांक : २९/१२/२०१२

प्रति,
सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी,
सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी.

**विषय : स्कूल बस नियमावली अंतर्गत बसेसना परवाना देणेबाबत.**

१. शालेय व्यवस्थापन स्कूल बस वाहतूकदारांशी करार करीत नसल्याने स्कूल बस वाहतूकदारांना परवाना मिळण्यास तसेच मोटार वाहन करातून सूट मिळण्यास अडचणी येत असल्याचे बस वाहतूकदारांनी या कार्यालयाच्या निदर्शना आणून दिले आहे.

२. शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या बस वाहतूकदारांना विनासायास परवाना मिळावा व विद्यार्थ्यांची वाहतूक करता यावी या दृष्टीने सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) मोटार वाहन कायदा, १९८८ व त्याअंतर्गत बनविलेल्या नियमातील बस बांधणीबाबतच्या तरतूदींची पूर्तता करणाऱ्या बसेसना सर्वसाधारण कंत्राटी परवाने जारी करावेत.

२) सर्वसाधारण कंत्राटी परवान्यावरील बसेसच्या मालकांनी शालेय व्यवस्थापनांशी करार केला नाही अशा **बसेसना वार्षिक / सहामाही / तिमाही दराने देय कर भरणे आवश्यक राहील.**

३) ज्या बसेस महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम २०११ च्या नियम १० मधील तरतूदींची (दि. २२/३/२०११ व दि. २५/६/२०१२ रोजीच्या शासन अधिसूचना) पूर्तता करीत असतील अशा बसेसना स्कूल बस नियमावलीनुसार शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करण्यासाठी परवाने जारी करावेत.

४) ज्या बसेसच्या मालकांना मोटार वाहन कर कायदा १९५८ च्या कलम १३ (२) नुसार शासन अधिसूचना क्र. एमव्हीए १७१० / सीआर २१३/टीआरए ३, दि. १६/१०/२०१० अन्वये देय असलेल्या करातून सूट पाहिजे असेल **त्यांनी शालेय व्यवस्थापनांशी करार करणे आवश्यक राहील.**

३. वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करून बसेसना परवाना जारी करावेत.

परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : प्रधान सचिव, गृह विभाग (परिवहन),
३० वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ०५ यांना माहितीकरिता सादर.

RTO PUNE COPY RIGHT